श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे अधिकृत नियतकालिक

साई अर्पण सेवा

वर्ष १ । अंक १ । मे-जून २०१८ । पाने ३६ । ₹ ८/-

संपादक

रुबल प्रखेर अग्रवाल, भा.प्र.से.

मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

विशेष कार्य अधिकारी

भगवान दातार

अंतरंग

जनसेवा हीच ईश्वर सेवा



- भगवान दातार ७

साईंचा आशीर्वाद आणि डॉक्टरांच्या कौशल्याचा संगम



- भगवान दातार ११

शिर्डीच्या साईबाबा मंदिरातील कीर्तनसेवेची परंपरा



- विद्याधर ताठे १७

समाजसेवेचे व्रत घेतलेले 'श्री साईनाथ' मंडळ



- मिलन म्हेत्रे २१

तिरुपतीला केशदान शिर्डीत रक्तदान




- प्रतिनिधी २४

संतांचा कर्मयोग सिद्धांत



- दीपा भंडारे २५

सेवा कधीही जाई न व्यर्थ



- मयूरी कदम २७

तेथे कर माझे जुळती



- मुग्धा दिवाडकर ३२



श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी


व्यवस्थापन समिती

डॉ. सुरेश काशिनाथ हावरे (अध्यक्ष)
श्रीमती रुबल प्रखेर अग्रवाल, भा.प्र.से.
(सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी)
ॲड. मोहन मोतीराम जयकर (सदस्य)
डॉ. राजेंद्र राजाबली सिंग (सदस्य)
श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे (सदस्य)
श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम (उपाध्यक्ष)
डॉ. मनिषा शामसुंदर कायंदे (सदस्य)
श्री. प्रताप सखाहरी भोसले (सदस्य)
श्री. भाऊसाहेब राजाराम वाक्चौरे (सदस्य)
श्री. रविंद्र गजानन मिर्लेकर (सदस्य)
श्री. अमोल गजानन कीर्तिकर (सदस्य)
सौ. योगिताताई शेळके (पदसिद्ध सदस्य)

श्री. धनंजय निकम (उपजिल्हाधिकारी)
श्री. मनोज घोडे पाटील (उपजिल्हाधिकारी)
डॉ. संदीप आहेर (उपकार्यकारी अधिकारी)

इंटरनेट आवृत्ती : URL:http://www.shrisaibabasansthan.org

■ आवरण व अन्य पृष्ठे सजावट तथा अक्षरजुळणी : इनोव्हेटिव्ह आयडिया, पुणे. भ्रमणध्वनी : ९२८४७२१६७४, ई-मेल : innovativeideaads@gmail.com ■ कार्यालय : 'साईनिकेतन', ८०४ बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४. दूरध्वनी : (०२२) २४१६६५५६ फॅक्स : (०२२) २४१५०७९ ई-मेल : saidadar@sai.org.in ■ शिर्डी कार्यालय : मु. पो. : शिर्डी - ४२३ १०९, ता. : राहाता, जि. : अहमदनगर. दूरध्वनी : (०२४२३) २५८५०० फॅक्स : (०२४२३) २५८७७०. ई-मेल : saibaba@shrisaibabasansthan.org | saibaba@sai.org.in ■ टपालखर्चासहित वार्षिक वर्गणी : ₹ ५०/- ■ आजीव सभासद वर्गणी : ₹ १०००/- ■ परदेशाकरिता वार्षिक वर्गणी : ₹ १०००/- ■ सर्वसाधारण अंकाचे मूल्य : ₹ ८/- ■ श्री साईपुण्यतिथी विशेषांकाचे मूल्य : ₹१५/- ■ प्रकाशक व मुद्रक रुबल प्रखेर अग्रवाल, मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करिता हे द्वैमासिक मे. प्रिंट प्लस प्रा. लि., १२२, शाह अँड नाहर इंडस्ट्रियल इस्टेट, ए-२, धनराज मिल कंपाऊंड, लोअर परेल, मुंबई - ४०० ०१३ येथे छापून 'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४ येथे प्रकाशित केले. या नियतकालिकातील लेखांत प्रसिद्ध झालेली मते ही त्या लेखांतील लेखकांची स्वतंत्र मते असून, त्या मतांशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. सर्वप्रकारच्या हरकती, वादविवाद, मतभेद, हक्क, कायदेशीर कार्यवाही आदी बाबी मुंबई परिक्षेत्रातच उपस्थित करता येतील.


श्रध्दा
सबुरी
श्री साईबाबा
समाधी शताब्दी महोत्सव
२०१७-२०१८
SHRI SAIBABA SANSTHAN TRUST SHIRDI



संपादकीय

'साई अर्पण सेवा' या नियतकालिकाचा हा पहिला अंक आज दि. १ मे रोजी 'महाराष्ट्र दिनी' साईभक्त वाचकांच्या हाती देताना आम्हांला विशेष आनंद होत आहे. योगायोगाने आज आद्य कीर्तनकार देवर्षी नारद यांची तिथीने जयंती आहे. याच दिवशी 'साई अर्पण सेवा'चा पहिला अंक प्रसिद्ध होत आहे, हा एक शुभसंकेतच म्हणावा लागेल. शिर्डी संस्थानतर्फे 'साईलीला' हे नियतकालिक १९२३ पासून गेली ९५ वर्षे अव्याहतपणे प्रसिद्ध होत आहे. साईभक्तांचा परिवार आता केवळ महाराष्ट्र किंवा भारतापुरताच मर्यादित राहिलेला नसून, तो सातासमुद्रापार अनेक देशांत पोहोचला आहे. साईंच्या लीलांची माहिती साईभक्तांना देण्याचे आणि त्यातून या सत्पुरुषाचे जीवनकार्य सर्व सश्रद्ध वाचक आणि अभ्यासकांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य 'साईलीला' हे नियतकालिक अतिशय प्रभावीपणे करीत आहे. यातून मोठ्या प्रमाणावर समाजप्रबोधनही होत आहे. बाबांनी त्यांच्या जीवनात श्रद्धा आणि सबुरीचा मंत्र दिला, तसे सेवेच्या आचार धर्माचे धडेही दिले. गोरगरिबांची, दीनदुबळ्यांची सेवा हेच बाबांचं जीवनकार्य होतं. सर्वच संतांनी सांगितलेल्या निरपेक्ष समाजसेवेचा आदर्श बाबांनी आपल्या आचरणातून घालून दिला. या सेवेत एवढा कनवाळूपणा होता की भक्तांना आईच्या ममतेची जाणीव व्हावी. बाबांच्या प्रेरणेने शिर्डीच्या साईसंस्थानने सेवेच्या क्षेत्रात अनेक नवे मापदंड उभे केले आहेत. साईपरिवारातही अनेक भक्तांनी आपापल्या परीने हे सेवाव्रत अखंडपणे चालू ठेवले आहे. या सेवाकार्याची भक्तांना माहिती व्हावी आणि नवनव्या उपक्रमांसाठी त्यांना प्रेरणा मिळावी यासाठी एक स्वतंत्र व्यासपीठ असावे, असे विश्वस्त मंडळाला वाटत होते. त्यातूनच सेवाकार्यावर भर देणाऱ्या नियतकालिकाची कल्पना पुढे आली आणि 'साई अर्पण सेवा' हे द्वैमासिक प्रसिद्ध करण्याचा निर्णय घेण्यात आला.

जगभरातील साईभक्त एका परिवाराच्या सूत्रात बांधले गेले, तर त्यातून सेवाकार्याची एक फार मोठी साखळी निर्माण होईल. त्यासाठी संस्थानच्या सेवाकार्याबरोबरच साईभक्तांकडून विविध ठिकाणी राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती या नियतकालिकाच्या अंकातून सचित्र दिली जाईल. साईभक्तांनी या अंकासाठी अशी माहिती अवश्य पाठवावी.

'साई अर्पण सेवा' सुरू करण्यामागची भूमिका स्पष्ट करणारी संस्थानचे अध्यक्ष डॉ. सुरेश हावरे यांची सविस्तर मुलाखत या अंकात प्रसिद्ध करण्यात आली आहे. रुग्णसेवेची गौरवशाली परंपरा असलेल्या शिर्डी येथील श्री साईनाथ रुग्णालयाचा सविस्तर परिचयही अंकात दिला आहे. या निमित्ताने तिथे उपचार घेणाऱ्या रुग्णांचं मनोगतही वाचकांना वाचायला मिळेल. पुणे येथील साईनाथ मंडळाच्या कार्याचा आढावा घेणाऱ्या लेखाबरोबरच साईभक्तीची सामाजिक मिमांसा करणारे नामवंतांचे लेखही या अंकात समाविष्ट करण्यात आले आहेत.

साईंच्या कृपाशीर्वादाने हा अंक भक्तांना समाजसेवेसाठी कार्यप्रवण करील, असा विश्वास वाटतो.

या अंकाची कल्पना ज्यांनी मनात रुजवली, कामाची प्रेरणा ज्यांनी दिली आणि ज्यांनी ते काम करवूनही घेतले त्या सद्गुरू साईनाथांना हा अंक अर्पण करतांना म्हणावेसे वाटते,

तुम्हींच आम्हांते सद्गुरू। तुम्हींच भवनदींचे तारूं।
आम्ही भक्त त्यातील उतारू। पैल पारू दाविजे।।

- संपादक

जनसेवा हीच ईश्वरसेवा



''कोट्यवधी भक्तांची साईबाबांवर नितांत श्रद्धा आहे. त्यांच्या मनातल्या या भक्तीचं सेवेत रूपांतर झालं तर गोरगरिबांचं कल्याण सहजपणे साधता येईल. निरपेक्षपणे केलेली ही सेवा हीच बाबांची पूजा आहे. भक्तीला सेवेची जोड द्यावी आणि सेवेच्या माध्यमातून काम उभं करावं हा अध्यक्षपदाची ही जबाबदारी स्वीकारण्यामागचा माझा मुख्य हेतू आहे.''

कोणत्याही कामात भक्ती आणि श्रद्धा असेल तर त्या कामाची शक्ती शतपटीने वाढते. मी शास्त्रज्ञ असलो तरी सश्रध्द आहे. कारण विज्ञान आणि श्रद्धा या गोष्टी परस्परांना पूरक आहेत असं मी मानतो. कोट्यवधी भक्तांची साईबाबांवर नितांत श्रद्धा आहे. त्यांच्या मनातल्या या भक्तीचं सेवेत रुपांतर झालं तर गोरगरिबांचं कल्याण सहजपणे साधता येईल. निरपेक्षपणे केलेली सेवा हीच बाबांची पूजा आहे असं मला वाटतं आणि सेवेच्या माध्यमातूनच आपली पूजा बाबांच्या चरणापर्यंत पोहोचेल अशी माझी श्रद्धा आहे, अशा शब्दात शिर्डीच्या साई संस्थानचे अध्यक्ष सुरेश हावरे यांनी आपली भूमिका मांडली.

साई संस्थानतर्फे प्रसिद्ध होणाऱ्या साई अर्पण सेवा या नव्या मासिकासाठी दिलेल्या प्रदीर्घ मुलाखतीत श्री. हावरे यांनी अध्यक्षपद स्वीकारण्यामागची भावना स्पष्ट करतांनाच संस्थानतर्फे सुरू करण्यात आलेल्या विविध उपक्रमांची व प्रकल्पांची सविस्तर माहिती दिली.

भगवान दातार

शास्त्रज्ञाचा मूळ पिंड आणि नंतर ज्येष्ठ व्यावसायिक म्हणून तितक्याच प्रभावीपणे बजावलेली भूमिका पाहता शिर्डीच्या साई संस्थानच्या अध्यक्षपदाची सर्वस्वी भिन्न जबाबदारी स्वीकारतांना आपली नेमकी काय भूमिका होती असं विचारलं असता, श्री. हावरे म्हणाले की, माझ्या स्वभावाची बैठक ही वैज्ञानिकाची आहे. बुद्धी आणि तर्क यांच्या निकषावर पटत असेल तरच कुठलीही गोष्ट स्वीकारावी असं मला वाटतं; पण जीवनात अनेक गोष्टी या श्रद्धेशी निगडित असतात. भावनेशी निगडित असतात. देव, देश , धर्म या श्रद्धेशी संबंधित अशा गोष्टी आहेत. अशा बाबतीत श्रद्धा असलीच पाहिजे. श्रद्धेशिवाय माणूस म्हणजे पशू होय. तुम्ही शास्त्रज्ञ, व्यावसायिक किंवा नोकरदार असं काहीही असलात तरी श्रद्धा असेल तर त्या त्या क्षेत्रात अधिक चांगलं काम होऊ शकतं, असा माझा अनुभव आहे. बाबांनी श्रद्धेवरच भर दिला; पण त्याचवेळी सबुरीलाही तितकंच महत्त्व असल्याचं सांगितलं. आजकाल आपल्याला सगळ्या गोष्टी झटपट हव्या असतात. पण कोणतीही गोष्ट हवी असेल तर त्यासाठी तितका वेळ द्यावा लागतो. त्यामुळे सबुरीही तितकीच महत्त्वाची आहे. श्रद्धेबरोबर सबुरी असेल तर कोणत्याही कामात परिपूर्णता येईल. या दोन्हीतील मेळ मानवजातीच्या कल्याणासाठी अत्यंत आवश्यक आहे. या दोन्हींइतकंच सेवेचंही महत्त्व आहे. लोकांच्या साईबाबांप्रती असलेल्या भक्तीला सेवेची जोड द्यावी आणि सेवेच्या माध्यमातून काम उभं करावं ही जबाबदारी स्वीकारण्यामागचा माझा मुख्य हेतू होता.

साई अर्पण सेवा या मासिकाच्या प्रकाशनामागची भूमिका विषद करतांना ते म्हणाले, लीला आणि सेवा हे बाबांच्या जीवनाचे दोन ठळक भाग आहेत. बाबांनी त्यांच्या जीवनात भक्तोद्धारासाठी अनेक लीला केल्या. त्या लीला सर्व परिचित आहेत; पण तेवढ्याच मोठ्या प्रमाणावर बाबांनी सेवाही केली आहे. त्यांनी लोकांसाठी भिक्षा मागितली, अन्न शिजवलं, दळण दळलं, भुकेलेल्यांना जेवू घातलं, रुग्णांची सेवा केली, वृक्षारोपण केलं, गोरक्षा केली. त्यांनी सांस्कृतिक कला आणि परंपरा

जोपासली. ते छोट्या मुलांशी खेळले. हातात झाडू घेऊन त्यांनी स्वच्छता केली, असे सेवेचे अनेक प्रसंग बाबांच्या जीवनात आहेत. बाबांनी समाजहितासाठी श्रद्धा आणि सबुरीचा मंत्र दिला तसं सेवेच्या आचार धर्माचे धडेही घालून दिले. या सेवाकार्याची आणि बाबांच्या प्रेरणेने चालणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती लोकांपर्यंत पोहोचविणे हा 'साई अर्पण सेवा' मागचा मुख्य उद्देश आहे.



"पाण्यात भक्ती मिसळली की ते तीर्थ होतं. तसं कामात भक्ती मिसळली की ती सेवा होते."

बाबांचं काम करणं म्हणजे गोरगरिबांची सेवा करणं हा धागा पकडून आपण या कामाला सुरुवात केली असं सांगून श्री. हावरे म्हणाले, भक्त हा विषय केंद्रस्थानी ठेवून आपण आणि विश्वस्त मंडळ सगळ्या योजना राबवित आहोत. भक्तांना बाबांचं सुखमय, समाधानकारक दर्शन सुलभतेनं मिळावं यासाठीच जास्तीत जास्त सोयी – सुविधा उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. रुग्णसेवेला बाबांच्या जीवनात खूप महत्त्वाचं स्थान होतं. ते लक्षात घेऊन संस्थानतर्फे दोन अद्ययावत हॉस्पिटल्स उपलब्ध करून देण्यात आली आहेत. या दोन्ही हॉस्पिटल्सच्या कार्याचा हावरे यांनी विशेषत्वाने उल्लेख केला. जनरल हॉस्पिटलमध्ये १ जानेवारी २०१७ पासून रुग्णांवर मोफत औषधोपचार केले जातात, तर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये कमी उत्पन्न गटातील रुग्णांवर अत्यल्प दरात उपचार केले जातात, याचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला. बाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्या सर्व भक्तांना प्रसादरूपाने मोफत भोजन दिलं जातं. रोज ७० ते ८० हजार भक्तांना ही सेवा २४ तास उपलब्ध करून दिली जाते. प्रसादालयातलं अन्न सोलरवर शिजवलं जातं. त्यामुळेच याचं वर्णन 'ग्रीन किचन, मेगा किचन' असं केलं जातं अशी माहिती त्यांनी दिली. रुग्णसेवा आणि अन्नदानाबरोबरच शिक्षणाकडेही संस्थेच लक्ष आहे. संस्थानतर्फे दोन विद्यालयं एक कनिष्ठ महाविद्यालय आणि एक आय. टी. आय. संस्था चालवली जाते. यात सुमारे ५००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. आय. टी. आय. मध्ये ११ ग्रेडस् असून ४५० विद्यार्थी आहेत. या सगळ्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेश दिले जातात. त्यामुळे तिथं भ्रष्टाचार किंवा वशिलेबाजीचा प्रश्नच येत नाही. मुख्य म्हणजे या विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणानंतर प्लेसमेंट दिली जाते. आतापर्यंत ९० टक्के विद्यार्थ्यांना या प्रयत्नातून नोकरी मिळाली आहे. संस्थानचं ज्युनिअर कॉलेज असून सिनियर कॉलेज सुरू करण्याचे प्रयत्न चालू आहेत . असं कॉलेज लवकरच सुरू होईल असं ते म्हणाले.

भक्तीची परंपरा तुमच्या घरात होती का? आणि संस्थानच्या कामाला दिशा देतांना नेमके काय प्रयत्न केले, याविषयी बोलतांना हावरे यांना बालपण आठवलं. वडील माळकरी होते, ते पंढरपूरला नेहमी जात असत. आई धार्मिक वृत्तीची होती. दोघांनाही सामाजिक कामाची आवड होती. कीर्तन प्रवचनासारख्या कामात घरातले सर्वजण सहभागी होत होते. घरात भाविकांचा, वारकऱ्यांचा नेहमी वावर असे. त्यामुळे आपल्याला धार्मिकतेचे व सामाजिकतेचे धडे घरच्या घरीच मिळाले. श्रद्धा हा माणसाचा स्थायी भाव आहे. आजारी पडल्यावर ज्याच्यावर श्रद्धा असेल अशा डॉक्टरकडेच आपण जातो. शास्त्रावर श्रद्धा असावी लागते, अन्यथा ज्ञान अपूर्ण राहतं. त्यात विसंगती, अंतर्विरोध निर्माण हतो. भक्तीला सेवेत रूपांतरीत करायचं असं म्हणतांना काम आणि सेवा यातला फरक आपण लक्षात घेतला पाहिजे. पाणी आणि तीर्थ यातला फरक आपल्याला मंदिरात गेल्यावर कळतो. शास्त्राच्या दृष्टीने दोन्ही पाणीच आहे. H_2O असंच त्याचं पृथ:करण होईल. पण प्रत्यक्षात दोन्हींचं महत्त्व वेगवेगळं आहे. पाणी हे पाणी आहे. तीर्थाचं पावित्र त्याला येणार नाही. अन्न व प्रसाद, गाणं व आरती यात फरक आहे. पाण्यात भक्ती मिसळली की त्याचं तीर्थ बनतं. अन्नात भक्ती मिसळली की त्याचा प्रसाद बनतो. गाण्यात भक्ती मिसळली की आरती होते. तसंच काम आणि सेवा यांच्यातही फरक आहे. कामात भक्ती मिसळली की त्याची सेवा बनते. त्याचबरोबर तीर्थ पळीभर असतं; पण मनाच्या शुद्धीकरणाला तेवढंच पुरतं. मला एक ग्लासभर तीर्थ द्या, असं कोणी म्हणत नाही. काम आणि सेवेचंही तसंच आहे. कणभर सेवा जे करू शकते ते मणभर काम करू शकत नाही. कोणत्याही कामात भक्ती मिसळली तर त्याची ताकद शतपटीने वाढते. या सेवेच्या आधारावर शिर्डीचा चेहरा अधिक समाजाभिमुख करणे हे आपलं उद्दिष्ट आहे.

सर्वाधिक महत्त्वाकांक्षी अशा तुमच्या दोन योजना कुठल्या? असं विचारल्यावर हावरे यांनी रक्तदान योजना आणि साई सेवक योजना यांचा उल्लेख केला, येणाऱ्या भक्तांना रक्तदान करण्याचं आवाहन संस्थानने केलं. अशी भक्तांना दर्शनात प्राधान्य देण्याची तरतूद केली. त्यामुळे तिरुपतीला केशदान तसं शिर्डीला रक्तदान अशी एक प्रथा निर्माण होत आहे. सध्या या योजनेतून रोज १०० बाटल्या रक्त उपलब्ध होतं. लवकरच ते रोज ५०० बाटल्यांचं प्रमाण गाठेल, असा त्याना विश्वास



वाटतो. मंदिराप्रमाणेच भक्त निवासस्थानाजवळ किंवा प्रसादालयाजवळ रक्तदानाची सोय निर्माण करण्यात येत आहे. अनेक खासगी रक्तपेढ्यांना या कामात जोडून घेतलं आहे. त्यांच्याद्वारे जमलेलं रक्त गरजूंना मोफत पुरवलं जातं.

साई सेवा प्रकल्प हीदेखील अशीच सेवाभावी भक्तांच्या सहभागाने राबवली जाणारी योजना आहे. यात भक्तांना सात दिवस मंदिराच्या व्यवस्थेत सेवा देण्याचं आवाहन केलं जातं. त्यांच्या वेळानुसार त्यांची नोंदणी केली जाते. २१ जणांचा एक गट असे १० गट प्रत्येक आठवड्यात शिर्डीत मंदिर परिसरात मुक्काम करून सेवा देतात. त्यांच्या निवासाची व भोजनाची व्यवस्था संस्थानर्फे केली जाते. आवाहन केल्यानंतर पहिल्याच दिवशी ११ हजार भक्तांनी साई सेवकाच्या कामासाठी नाव नोंदवलं आहे. या सेवकांना मंदिरातर्फे पोषाख दिला जातो, छोटसं प्रशिक्षणही दिलं जातं आणि आठवड्याच्या शेवटी प्रमाणपत्रही दिलं जातं. शेगावच्या गजानन महाराज संस्थानच्या धर्तीवर ही योजना राबविण्यात येत आहे.

जगभरातल्या साई परिवाराला एकत्र आणण्याचं आणखी एक स्वप्न हावरे यांच्या नजरेसमोर आहे. जगात ४३ देशांत ४५० पेक्षा जास्त साई मंदिरे आहेत, तर भारतात ८००० ठिकाणी साई मंदिरे आहेत. साई परिवाराचा हा विस्तार पाहिला तर या साई भक्त चळवळीला व्हॅटिकनचं स्वरूप येऊ शकतं. या सगळ्यांना एका समान सूत्रात गुंफून त्यांना एकसमान कार्यक्रम देण्याचं व वर्षातून त्यांचा एक महामेळावा घेण्याचा त्यांचा मानस आहे. या प्रयत्नातून गेली दोन वर्ष डिसेंबरमध्ये जागतिक साईमंदिर परिषद भरवण्यात आली. त्यात २२ देशातून विविध मंदिरांचे ४००० हजार प्रतिनिधी सहभागी झाले होते.

याबरोबरच स्पर्धा परीक्षांसाठी गरीब विद्यार्थ्यांना निवास, भोजन व मार्गदर्शनाची मोफत सोय उपलब्ध करून देण्याची संस्थानची योजना आहे. निवृत्त आय. ए. एस. अधिकारी सुधीर ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली यासंदर्भात प्रयत्न चालू आहेत. देशात विविध मंदिरांत प्रशिक्षित पुजाऱ्यांची फार मोठी गरज आहे. ती लक्षात घेऊन पुजारी प्रशिक्षण अभ्यासक्रम सुरू करण्याचीही योजना आकार घेत आहे. शहरातील घन कचरा व्यवस्थापनासाठी एक अद्ययावत प्रकल्प उभा करण्याचीही संस्थानची योजना आहे. अशी कितीतरी कामं हावरे यांना पूर्ण करायची आहेत.

माणसाच्या मनात श्रद्धा असेल, डोळ्यात स्वप्नं असतील आणि स्वीकारलेलं काम प्रामाणिकपणे पूर्ण करण्याची सचोटी त्याच्याकडे असेल आणि या सगळ्याच्या मुळाशी निरपेक्ष समाजसेवेची ऊर्मी असेल तर तो काय चमत्कार घडवू शकतो याचं सुरेश हावरे हे मूर्तीमंत उदाहरण आहे. स्वाभाविकपणेच त्यांच्या या योजनांना भक्तांचा भरभरून प्रतिसाद मिळत आहे.



> बाबांच्या दर्शनासाठी दूरवरून येणाऱ्या भक्तांच्या सुख-सोयींना प्राधान्य द्यावं असं मला नेहमीच वाटतं. यासाठी अनेक नव्या योजनांना मी सुरुवात केली. मग ती हॉस्पिटल मधली एखादी योजना असो अथवा एखाद्या रस्त्याचे डांबरीकरण किंवा एखाद्या नव्या यंत्रणेचा शुभारंभ. संस्थानचे सर्वच अधिकारी आणि कर्मचारी समर्पण भावनेने अशा कामात सहभागी होतात. भक्तांना समाधान देणे, त्यांच्या अडचणी दूर करणे, त्यांना संतुष्ट करणे हीच तर खरी ईश्वर सेवा आहे. असं आम्ही मानतो. त्यामुळे आम्ही सगळे अशा कामांना नेहमीच अग्रक्रम देतो.

आपली कार्यपद्धती पूर्णपणे वेगळी आहे असं सांगताना हावरे म्हणाले की, समस्या जाणून घेण्यासाठी मी संबंधितांशी थेट संपर्क साधतो. रुग्णालयात जाऊन मी तिथल्या रुग्णांशी आणि त्यांच्या नातेवाईकांशी थेट बोलतो. माझ्याबरोबरच्या चर्चेत जवळपास ९० टक्के रुग्णांनी उपचारांबद्दल समाधान व्यक्त केलं आहे.

ही कार्यपद्धती किंवा मनोवृत्ती कशी निर्माण झाली याचा एक किस्सा हावरेंनी सांगितला. चार वर्षापूर्वी हावरे त्यांच्या कुटुंबीयांसह शिर्डीला दर्शनासाठी गेले होते. ज्यावेळी ते



> हजारो मंदिरात पुजाऱ्यांची गरज आहे. असे प्रशिक्षित पुजारी मिळावेत म्हणून अभ्यासक्रम सुरु करणार आहोत.

समाधीपर्यंत पोहोचले तेंव्हा एवढी गर्दी झाली की ते आणि त्यांच्या बरोबरचे कुटुंबीय एका क्षणात बाहेर फेकले गेले. त्यांना व्यवस्थितपणे दर्शन घेता आलं नाही. यापुढे आपण शिर्डीला येणार नाही असं त्यांनी पत्नीला आणि कुटुंबीयांना सांगितलं. पण त्यानंतर तीनच वर्षांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हावरेना बोलवून घेतलं आणि त्यांच्याकडे अध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली. 'एका अर्थाने बाबांनीच तुम्हाला बोलावलं' असं मुख्यमंत्री म्हणाले आणि हावरेंनाही ते पटलं.

सूत्रं हाती घेतल्यावर हावरे जेंव्हा शिर्डीला गेले तेंव्हा ते सरळ भक्तांच्या रांगेत जाऊन उभे राहिले. थेट रांगेत उभं राहून भक्तांच्या अडचणी समजून घेणारा असा अध्यक्ष संस्थानला प्रथमच मिळाला असेल.

सेवेला कारुण्याची जोड असेल तर ती थेट काळजाला जाऊन भिडते. आपली सामाजिक जाणीव ही अशीच कारुण्यावर आधारलेली असली पाहिजे, असं हावरेंना वाटतं. त्यांच्या विविध निर्णयांनाही अशीच करुणेची झालर आहे. गेल्या अनेक वर्षांपासून राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. या आत्महत्यांनी व्यथित झालेल्या हावरेंना त्या रोखण्याच्या कामात संस्थानचाही सहभाग असला पाहिजे, असं प्रकर्षानं वाटत होतं. त्यासाठी एका स्वयंसेवी संस्थेच्यामार्फत सर्वाधिक आत्महत्या झालेल्या यवतमाळ जिल्ह्यातील स्थितीची पाहणी करण्यात आली. जिल्ह्यातील ६०० पीडित कुटुंबांची निवड करून संस्थानने त्या कुटुंबातील व्यक्तींना रोजगार मिळावा यासाठी छोटा उद्योग सुरू करण्यासाठी आर्थिक मदत करण्याची योजना हाती घेतली आहे. अनेक कुटुंबांपर्यंत अशी मदत पोहोचलीही आहे आणि त्यातून त्या लोकांनी कुक्कुटपालन, पिठाची गिरणी, सायकलचं दुकान, भाजी विकण्याचे दुकान असे छोटे उद्योग सुरू केले आहेत.

कॅन्सरच्या रुग्णांसाठी संस्थानतर्फे शिर्डीत १०० बेडस्चं एक हॉस्पिटल काढण्याचा हावरेंचा मानस आहे.

असा हा सेवेचा अखंड ध्यास घेतलेला अध्यक्ष. या सगळ्यामागे बाबांवरील श्रद्धा आणि ते देत असलेली ऊर्जा हेच कारण आहे असं ते मानतात. भक्तीला सेवेची जोड देऊन शिर्डीचा चेहरामोहराच बदलण्याचा त्यांचा निर्धार आहे.

■■■

साईंचा आशीर्वाद आणि डॉक्टरांच्या कौशल्याचा संगम



सेवा हीच साईबाबांच्या जीवनाचं सार होतं. श्रद्धा आणि सबुरी या मंत्राबरोबरच बाबांनी सेवेचे धडे घालून दिले. विशेषत: रुग्णसेवेला त्यांनी खूप महत्त्व दिलं. त्यांच्याच प्रेरणेने शिर्डीमध्ये दोन अद्ययावत हॉस्पिटल्स चालू आहेत. यातल्या श्री साईनाथ रुग्णालयात १ जानेवारी २०१७ पासून नि:शुल्क रुग्णसेवा चालू आहे. लाखो रुग्णांनी याचा लाभ घेतला आहे.

भगवान दातार

गोरगरिबांची, दीनदुबळ्यांची सेवा हीच कोणत्याही संताचे वैशिष्ट्य आहे. पूजनीय साईंच्या जीवनकार्याचं तर सेवा हेच सार होतं असं म्हणता येईल. त्यातही रुग्णसेवेवर त्यांचा अधिक भर होता. मातेच्या ममतेने ते रुग्णांची सेवा करीत. आजही साईंच्या मूर्तीच्या डोळ्यांमध्ये सर्वाधिक जाणवते ती त्या डोळ्यातील स्नेहशील करुणा, वात्सल्य आणि भक्तांच्या साऱ्या वेदनांना केवळ नजरेतूनच मिळणारी मायेची हळूवार फुंकर.

रुग्णसेवा हेच व्रत मानून साई संस्थानच्या वतीने शिर्डीत कार्यरत असलेल्या दोन रुग्णालयांनीही केवळ पंचक्रोशीतच नव्हे तर राज्याबाहेरही सेवेची ही पताका फडकत ठेवली आहे. देशाच्या विविध भागातले रुग्ण या सेवेचा लाभ घेत आहेत.

साईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल आणि श्री साईनाथ हॉस्पिटल या संस्थानतर्फे चालणाऱ्या रुग्णालयात वर्षभरात सुमारे साडेपाच लाख रुग्ण उपचार घेऊन जातात. आश्चर्य म्हणजे इतर अनेक नामवंत रुग्णालयांनी आशा सोडलेले किंवा नाकारलेले रुग्ण येथील उपचारांनी बरे झाले आहेत.

१९६४ मध्ये साध्या डिस्पेन्सरीपासून सुरू झालेले श्री साईनाथ हॉस्पिटल हे आज ३०० बेडस्चे सुसज्ज हॉस्पिटल बनले आहे. जनरल सर्जरी, जनरल मेडिसीन, बालरोग, स्त्रीरोग, आर्थोपेडिक, नाक– कान – घसा विकार, नेत्रोपचार, दंत चिकित्सा, फिजिओथेरपी, प्रसुती अशा सर्व बाबतीत इथं उपचार होतात. ॲलोपॅथीबरोबरच होमिओपॅथी आणि आयुर्वेदिक पद्धतीनेही उपचार केले जातात. इंग्रजीत ज्याला Healing Touch म्हणतात. तो उपचारातला मायेचा स्पर्श हे तर या रुग्णालयाचे वैशिष्ट्य आहेच. पण इथल्या डॉक्टरांनी कल्पकतेने अनेक नवनवे उपक्रम राबवले आहेत. या साऱ्या उपक्रमांचा हजारो रुग्णांना फायदा होत आहे. विशेष म्हणजे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे देशविदेशातील अनेक नामवंत डॉक्टर्स या उपक्रमांमध्ये सहभागी होत असतात.

मोबाईल क्लिनिक किंवा साई मंदिरातले प्रथमोपचार केंद्र' हे वरवर साधे वाटणारे पण रुग्णांसाठी अत्यंत उपयुक्त ठरलेले उपक्रम. मोबोईल क्लिनिक या उपक्रमात रुग्णालयाची एक सुसज्ज ॲंब्युलन्स शिर्डीबाहेरच्या एखाद्या मार्गावर ५ ते ७ गावांमध्ये जाते. या ॲंब्युलन्सबरोबर एक डॉक्टर, एक फार्मासिस्ट, एक स्टाफ नर्स आणि एक वैद्यकीय मदतनीस असतो. त्या त्या गावात एका विशिष्ट ठिकाणी ही ॲंब्युलन्स थांबते. गावातले रुग्ण तिथं जमतात आणि त्यांची तपासणी करून त्यांना तिथल्यातिथं औषधं दिली जातात. ही औषधं मोफत असतात. किरकोळ आजाराकडे कायम दुर्लक्ष करण्याची सवय असलेल्या गावकऱ्यांना व विशेषत: कामाच्या व्यापातून वेळ काढू न शकणाऱ्या महिलांना या सेवेचा खूपच फायदा होतो. ही ॲंब्युलन्स आठवड्यातून चार दिवस शिर्डी परिसरातल्या वेगवेगळ्या भागात ५ – ७ गावांना जाते.

असाच एक साधा पण उपयुक्त ठरलेला उपक्रम म्हणजे मंदीर परिसरातली प्रथमोपचार केंद्रे. मंदिर परिसरात २ ठिकाणी प्रथमोपचार केंद्रांमार्फत सकाळी ६ ते रात्री ११ वाजेपर्यंत ही













तज्ज्ञ डॉक्टर्स, मोफत सुविधा आणि कर्मचाऱ्यांकडून आस्थेने घेतली जाणारी काळजी यामुळे महाराष्ट्राच्या काना-कोपऱ्यातून नव्हे तर देशाच्या अन्य भागातूनही रुग्ण मोठ्या संख्येने या रुग्णालयात येतात. यात रुग्णांच्या बाबांवरील श्रद्धेचाही मोठा भाग आहे. चिखलीतला ४ थ्या इयत्तेत शिकणारा पवन आंबिलवाले, टेलरिंगचे काम करणारा जळगाव जिल्ह्यातल्या चोकणचा योगेश पाटील, नांदेडच्या मुक्ता बोदले, ब्रेस्ट कॅन्सर झालेल्या साताऱ्याच्या शालिनी टिळे, सिल्लोड तालुक्यातल्या भोकरदनचे ६५ वर्षांचे ओंकार बारकुबा मतलबे, स्टोव्हचा भडका उडून चेहरा भाजलेली ९ वी तली प्रियंका खडके असे अनेक रुग्ण बाबांवरील श्रद्धा आणि डॉक्टरांवरील विश्वास या आधारावर इथं उपचार घेत आहेत. तिरुपतीमध्ये चहाच्या स्टॉलवर काम करणारा प्रसाद गुज्रुल याला विजेचा जोरदार शॉक लागल्याने त्याचा हात जवळजवळ निकामी झाला होता. रुग्णालयाची माहिती ऐकून तो उपचारांसाठी इथं आला. डॉ. चिल्गर यांनी त्याच्या हातावर शस्त्रक्रिया केली. 'अनेक डॉक्टर पाहिले, पण चिल्गर सरांसारखा डॉक्टर पाहिला नाही' असं तो तोडक्या मोडक्या हिंदीत म्हणाला.

आपण केवळ बाबांच्या श्रद्धेपोटी इथं आलो. ते सगळं नीट करतील' असं लोणारचे रामदास तनपुरे म्हणाले.

सेवा दिली जाते. मात्र गर्दीच्या दिवशी किंवा उत्सवाच्या दिवशी भक्त निवास, प्रसादालय अशा सहा ठिकाणी ही सेवा दिली जाते. बाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांना अचानक काही झाल्यास या केंद्रात उपचार केला जातो. नेमकी गरज लक्षात घेऊन उपाययोजना करण्याची रुग्णालय अधिकाऱ्यांची कल्पकता यातून दिसून येते.

या रुग्णालयाच्या जनरल सर्जरी विभागाने असाच नाव लौकिक संपादन केला आहे. डॉ. राम नाईक यांच्यासारखे तज्ज्ञ डॉक्टर्स या विभागात आहेत. डॉ. नाईक सकाळी ८ पासून रात्री १० पर्यंत अथकपणे काम करत असतात. कॅन्सर किंवा पोटाच्या आजारावरच्या विशेषत: स्वादूपिंडावरील शस्त्रक्रियेसारख्या अतिशय कठीण शस्त्रक्रिया त्यांनी यशस्वीपणे केल्या आहेत.

आयुर्वेदिक विभागात डॉ. रामदास आव्हाड कुठलाही मोबदला न घेता गेली १८ वर्षे सेवा देत आहेत. सर्जरी विभागात डॉ. दीपक नजन दर शनिवारी विना मोबदला सेवा देतात.

नेत्र विभागात नवीन 'फेको' पद्धतीचा वापर करून मोतिबिंदूच्या रोज २० ते २५ शस्त्रक्रिया केल्या जातात.

(पुढील मजकूर पान १६ वर)



असो कित्येक दर्शनें पुष्ट । कित्येक झाले दुष्टांचे सुष्ट ।
कित्येकांचे गेले कुष्ट । पावले अभीष्ट किती एक ।
न घालिता अंजन पाला रस । कितीक अंध झाले डोळस ।
आले पाय कितीक पंगूंस । केवळ पायांस लागतां ।
महिमा तयांचा अनिवार । कोणा न लागे तयांचा पार ।
यात्रा येऊं लागली अपार । अपरंपार चौंबाजूं ।
डोईस सफेत पागोटें खासें । स्वच्छ धोतर लावीत कासे ।
अंगांत सदरा की पैरण असे । पेहरावा ऐसा आरंभी ।
आरंभी गावी वैद्यकी करीत । पाहूनि पाहूनि दवा देत ।
हातालाही यश बहुत । हकीम विख्यात जाहले ।



प्लास्टिक सर्जरी शिबिरात अनेक लहान मुलांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली.

आरोग्य शिबिरातून आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या डॉक्टरांकडून उपचार

साईबाबा शताब्दी वर्षानिमित्त या रुग्णालयाने विविध आजारांविषयीचे कँप आयोजित करून एक अभिनव योजना राबवली. रुग्णालयाने आतापर्यंत ७ विशेष वैद्यकीय शिबिरं आयोजित केली. या शिबिरांना खूप चांगला प्रतिसाद मिळाला.

पहिलं शिबिर नेत्रतपासणीचं झालं. यात १००० रुग्णांचे डोळे तपासून त्यांना चष्मे देण्यात आले. ज्यांच्यासाठी योग्य चष्मे उपलब्ध नव्हते त्यांना ते शिबिर संपल्यानंतर पाठविण्यात आले. प्रकाश गंगवाणी यांनी या शिबिरासाठी विशेष सहकार्य केलं.

मोतिबिंदूवरील शिबिरात मुंबईतल्या व्हिजन आय फाउंडेशन' चे डॉ. सौमिल कोठारी उपस्थित होते. त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी दोन दिवसांत मोतिबिंदू व तिरळेपणावरील उपचाराच्या १०७ शस्त्रक्रिया केल्या.

रक्तदान शिबिरात एका दिवसात १०६० बाटल्या रक्त जमा झालं. (या शिबिराविषयीची माहिती याच अंकात अन्यत्र दिली आहे.) जानेवारी महिन्यात किडनी स्टोन विषयीचं शिबिर झालं. अहमदाबाद येथील डॉ. केतन शुक्ला हे या विषयातले राष्ट्रीय तज्ज्ञ मानले जातात. ते वर्षातून ४-५ वेळा या रुग्णालयत येतात. स्वत:ची सुसज्ज व्हॅन घेऊन येतात. अत्यंत कठीण शस्त्रक्रियाही त्यांनी सहजतेनं यशस्वी केल्या आहेत.

फेब्रुवारी महिन्यात पार पडलेलं जयपूर फूट विषयीचं शिबिर तर या सर्वांवरचा कळस मानावा लागेल. भगवान महावीर विकलांग सहायता समिती, जयपूर यांच्या मुंबई शाखेने या शिबिराला विशेष सहकार्य केलं होतं. सहा दिवस चाललेल्या या शिबिरात एकूण ७०९ जणांवर उपचार करण्यात आले. सेबीचे माजी अध्यक्ष पद्मभूषण डॉ. डी. आर. मेहता हे जातीने या शिबिरासाठी जयपूरहून आले होते. ८५ वर्षाचे असलेले डॉ. मेहता त्या दिवशी उपचारासाठी आलेल्या प्रत्येक रुग्णांशी बोलले. सहा दिवसांत या शिबिरात आलेल्या एकाही रुग्णाला उपचाराविना परत पाठवण्यात आले नाही.



पद्मभूषण डॉ. डी. आर. मेहता यांच्या उपस्थितीने रुग्णांना कमालीचा दिलासा मिळला.

गौरव कन्येचा

या रुग्णालयात आणखी एक हृद्य प्रसंग पहायला मिळाला. रुग्णालयात महिन्यात साधारणपणे ५० महिलांची प्रसुती होते. शिर्डीच्या शीलधी प्रतिष्ठान'चे अध्यक्ष राजेंद्र कोते आणि उपाध्यक्ष तुषार शेळके यांनी लेक वाचवा' या मोहिमेला उत्तेजन देण्यासाठी एक अभिनव उपक्रम सुरू केला आहे. शताब्दी वर्षात या रुग्णालयात जन्म घेणाऱ्या मुलीला या संस्थेतर्फे चांदीचं एक नाणं तिचा गौरव म्हणून देण्यात येतं. ही मुलाखत झाली त्या दिवशी खडकी इथल्या प्रणिता प्रकाश पवार यांच्या कन्येला असं नाणं दिलं गेलं.



विशेष म्हणजे काही वर्षांपूर्वी डॉ. मेहतांना अपघात झाला होता. पायाला इजा झाल्यामुळे ते अनेक दिवस अंथरुणावर होते. अपघातात ज्यांना पायच गमवावा लागतो, त्यांचे जीवन कसे जात असेल हा प्रश्न त्याना या काळात अस्वस्थ करत होता. त्या तळमळीतूनच त्यांनी हा जयपूर फूट शोधून काढला. याला जोडूनच कृत्रिम हात रोपण शिबिर घेण्यात आलं. रोटरी क्लब ऑफ पुना डाऊन टाऊन यांनी या शिबिरासाठी विशेष, सहकार्य केलं. या शिबिरात ७४ रुग्णांना कृत्रिम हात बसवण्यात आला.

प्लास्टिक सर्जरी ही तर वैद्यकीय क्षेत्रातली जादूच म्हटली पाहिजे. 'गीव्ह मी फाय फाउंडेशन'च्या औरंगाबाद शाखेच्या वतीने विख्यात सर्जन डॉ. राम चिल्गर यांच्या नेतृत्वाखाली हे शिबिर घेण्यात आलं. या शिबिरासाठी तैवान, सिंगापूर, फिलिपिन्स, पेरू, अमेरिका आदी देशातले ९ तज्ज्ञ डॉक्टर्स आले होते. २० डॉक्टरांची टीम या शिबिरासाठी आपलं कौशल्य पणाला लावत होती. तैवानचे जगप्रसिद्ध प्लास्टिक सर्जरी तज्ज्ञ डॉ. हंग ची चॅन हे या शिबिराचे नेतृत्व करत होते. ७० वर्षाच्या डॉ. चॅन यांनी स्वत: हत्ती पायावरील सर्जरीचा शोध लावला आहे. या शिबिरात त्यांनी हत्ती रोग झालेल्या एका रुग्णाच्या पायावर शस्त्रक्रिया केली. याच शिबिरात शीर जोडण्याची एक अतिशय कठीण शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आली. भाजलेल्या रुग्णांवर त्वचा रोपण शस्त्रक्रिया करण्यात आल्या. या सर्व शस्त्रक्रिया मोफत करण्यात आल्या. ३ दिवसांत एकूण ८८ रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्यात आल्या. ■



मोफत पाय रोपण व हात रोपण शस्त्रक्रिया शिबिरात रुग्णांना सायकल वाटप करण्यात आले.



प्लास्टिक सर्जरी शिबिरासाठी आलेले तैवान, सिंगापूर, फिलिपिन्स, पेरू, अमेरिका आदी देशातील तज्ज्ञ डॉक्टर्स.

साईबाबा शताब्दी महोत्सवानिमित्त झालेल्या शिबिरांची यादी

क्रमांक	शिबिर	दिनांक	लाभार्थी
१	नेत्रतपासणी व चष्मेवाटप	१/१०/२०१७	१०००
२	मोतिबिंदू व तिरळेपणा शस्त्रक्रिया	२/१०/२०१७	१०९
३	रक्तदान महाशिबिर	३०/१२/२०१७	१०६०
४	किडनी स्टोन उपचार	१६/१/२०१८	५५
५	जयपूर फूट शिबिर	१५/२/२०१८	७०९
६	कृत्रिम हात रोपण	२०/२/२०१८	७४
७	प्लास्टिक सर्जरी	१८/३/२०१८	८८

साईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलची माहिती पुढील अंकात



रुग्णांची विचारपूस करताना संस्थानचे अध्यक्ष डॉ. सुरेश हावरे आणि उपाध्यक्ष चंद्रशेखर कदम.

(पान १२ वरुन)

रुग्णालयात ८ बेडचा अति दक्षता विभाग (ICU) आहे. १ जानेवारी २०१७ पासून या रुग्णालयातील उपचार पूर्णपणे मोफत करण्यात आले आहेत. रुग्णाला फक्त १० रुपये भरून केसपेपर काढावा लागतो. एका अर्थाने हा ऐतिहासिक निर्णय आहे. शिर्डी परिसर, नाशिक, नगर, धुळे, जळगाव हे जिल्हे आणि मराठवाडा व विदर्भ या भागातून अनेक रुग्ण या रुगणालयात उपचारासाठी येतात. रुग्णांना मोफत जेवण दिलं जातंच; पण त्यांच्या नातेवाईकांनाही प्रसादालयातून मोफत भोजन दिलं जातं . त्यांच्या राहण्याची सोयही मोफत केली जाते. नातेवाईकांना रुग्णालय ते त्यांच्या निवासापर्यंत जाण्या–येण्यासाठी संस्थेने मोफत बससेवा उपलब्ध केली आहे.

क्षय आणि एड्स या रोगांवरील उपचारांसाठी शासनाच्या वतीने या रुग्णालयात एक केंद्र चालवलं जातं. या केंद्रासाठी संस्थानने जागा उपलब्ध करून दिली आहे.

गरीब व गरजू रुग्णांना संस्थानतर्फे विशिष्ट नियमावलीनुसार २५ हजार रुपयांचं अनुदान दिलं जातं. त्या रुग्णावरील अधिक उपचारांसाठी ही मदत संबंधित रुग्णालयांकडे वर्ग केली जाते. संस्थानतर्फे १९६४ पासून ही योजना राबवली जात आहे.

सध्या रुग्णालायत ६४ डॉक्टर्स आहेत. ८ व्हिजिटिंग डॉक्टर्स आहेत. विशेष कारणासाठी सेवा देणारे डॉक्टर्स धरून ही संख्या १०० च्या घरात जाते. या सर्व तज्ज्ञ डॉक्टरांच्या अथक प्रयत्नांतून आणि अधीक्षक डॉ. मैथिली पितांबरे यांच्या कुशल नेतृत्वाखाली रुगणालय यशस्वीपणे वाटचाल करत आहे.

या रुग्णालयात उपचार घेणाऱ्या अनेक रुग्णांशी मी वॉर्डात जाऊन बोललो. बाबांविषयीची श्रद्धा आणि डॉक्टरांविषयीची आणि कृतज्ञता तिथं उपचार घेणाऱ्या त्यांच्या शब्दा शब्दातून व्यक्त होत होती.

■■■

शिर्डीच्या साईबाबा मंदिरातील कीर्तनसेवेची परंपरा



आद्य कीर्तनकार देवर्षी नारद मुनी यांची तिथीने वैशाख कृष्ण प्रतिपदेला म्हणजे दिनांक १ मे रोजी जयंती येते. 'कीर्तन'सेवा हा नवविध भक्तीमधील एक प्रमुख भक्ती प्रकार. या सेवेला फार मोठी परंपरा आहे. शिर्डीमध्ये १९११ साली रामजन्मोत्सवानिमित्त कीर्तनसेवेची परंपरा सुरू झाली व ती आजपर्यंत अव्याहतपणे सुरू आहे. कीर्तनाने समाज प्रबोधनाचे फार मोठे काम केले आहे.

नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी ।।

थोर कीर्तनकार संत नामदेव (तेरावे शतक) यांनी वरीलप्रमाणे कीर्तनाचे उद्दिष्ट प्रतिपादन केले आहे. कीर्तन ही इष्ट देवतेची भक्ती आहे, आराधना आहे तद्वतच कीर्तन ही सेवा आहे. ती दासभावाने, समर्पित सेवावृत्तीने करावयाची असते व केली जाते. आपल्या भारतीय परंपरेत श्रेष्ठ भक्त भागवत नारदमुनींना आद्य कीर्तनकार मानले जाते.

इष्ट देवतेची भक्ती विविध नऊ प्रकारे केली जाते. यालाच 'नवविध' भक्ती म्हटले जाते. १) श्रवणभक्ती २) कीर्तनभक्ती ३) नामस्मरणभक्ती ४) पादसेवनभक्ती ५) अर्चनभक्ती ६) वंदनभक्ती ७) दास्यभक्ती ८) सख्यभक्ती आणि ९) आत्मनिवेदनभक्ती असे हे भक्तीचे नऊ प्रकार गेली हजारो वर्षे भाविकभक्तांकडून आचरले जात आहेत. या नऊ भक्ती प्रकारामध्ये 'कीर्तना'ला अद्वितीय स्थान आहे. कीर्तनाच्या अनेक पद्धती देशाच्या विविध भागात, विविध पंथ-संप्रदायात रूढ झालेल्या आहेत. महाराष्ट्रात नारदिय कीर्तन परंपरा 'हरिदासी कथा' या नावाने ओळखली जाते. याशिवाय 'वारकरी कीर्तन' परंपरा आणि शीखांची 'शबद कीर्तन' परंपरा अशा अनेक कीर्तन परंपरा आहेत. वारकरी कीर्तन परंपरेला संत ज्ञानदेव-संत नामदेवापासूनची ८०० वर्षाची प्रदीर्घ पार्श्वभूमी आहे. कीर्तन हे समाजप्रबोधनाचे व भक्तीप्रचाराचे सर्वात प्रभावी माध्यम आहे. तसेच कीर्तनाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे 'कीर्तन ही सामूहिक भक्तीसेवा आहे.' आधुनिक भाषेत सांगायचे तर कीर्तन हे Effective and Collective साधन आहे. विशेषतः अलीकडच्या काळातील (२० व्या शतकातील) संत गाडगे महाराजांचे कीर्तन तर संवादशील होते. ते श्रोत्यांना प्रश्न करीत व सामूहिक उत्तर देत श्रोते कीर्तनात सहभागी होत असत.

विद्याधर ताठे

कीर्तनाचे 'गुणकीर्तन', 'लीलाकीर्तन' आणि 'नामकीर्तन' असेही तीन प्रकार अहोत. ईश्वराच्या षडगुण ऐश्वर्याचे वर्णन ज्या कीर्तनात केले जाते त्यास 'गुणकीर्तन' म्हणतात. तर ईश्वराच्या लीला – जीवनप्रसंग ज्यात गायले जातात ते 'लीलाकीर्तन' होय. यात देवाचे विविध अवतार व संतचरित्रे सांगितली जातात. नाम महात्म्यपर कीर्तनास 'नामकीर्तन' म्हणतात. संत एकनाथमहाराज यांनी कीर्तनाची गुणवैशिष्ट्ये कथन करणारा एक सुरेख अभंग लिहिलेला आहे. तो असा –

सगुण चरित्रे परम पवित्रे सादर वर्णावी ।
सज्जनवृंदे मनोभावे आधी वंदावी ।।१।।
संतसंगे अंतरंगे नाम बोलावे ।
कीर्तनरंगी देवासन्निध सुखे डोलावे ।।२।।
भक्तीज्ञानाविरहित इतर गोष्टी न कराव्या ।
प्रेमभरे वैराग्याच्या गोष्टी विवराव्या ।।३।।
जेणे करूनि मूर्ति ठसावी अंतरी श्रीहरीची ।
ऐसी कीर्तनमर्यादा आहे संतांच्या घरची ।।४।।
अद्वय भजने अखंड स्मरणे वाजवी करटाळी ।
एका जनार्दनी मुक्त होय तत्काळी ।।५।।

(पुढील मजकूर पान २० वर)



श्रीरामनवमी उत्सवपर्वानिमित्त संस्थानचे अध्यक्ष डॉ. सुरेश हावरे यांच्या हस्ते श्री साईबाबा समाधी शताब्दी स्तंभाच्या ध्वजाचे विधीवत पूजन करून ध्वज बदलण्यात आला. यावेळी संस्थानचे उपाध्यक्ष चंद्रशेखर कदम, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती रूबल अग्रवाल, विश्वस्त तथा नगराध्यक्षा सौ. योगिताताई शेळके, सौ. नलिनी हावरे, सौ. प्रियतमा कदम, उपजिल्हाधिकारी धनंजय निकम, मनोज घोडे पाटील, उपकार्यकारी अधिकारी डॉ. संदीप आहेर उपस्थित होते.



श्रीरामनवमीउत्सवानिमित्त मंदिराच्या प्रवेशद्वारावर श्री द्वारकामाई मंडळ, मुंबई यांनी उभारलेला देखावा व विद्युत रोषणाई.

रामनवमी वृत्त

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या वतीने आयोजित केलेला श्रीरामनवमी उत्सव मंगलमय वातावरणात पार पडला. श्री साईबाबांच्या समाधीच्या दर्शनासाठी राज्यातून विविध ठिकाणाहून सुमारे १७५ पालख्यांसोबत आलेल्या पदयात्री साईभक्तांच्या श्रीसाईनामाच्या गजराने अवघी शिर्डी दुमदुमून गेली.

उत्सवाच्या प्रथम दिवशी पहाटे काकड आरतीनंतर साईबाबांच्या प्रतिमेची व श्री साईसच्चरित या पवित्र ग्रंथाची मिरवणूक व्दारकामाई पर्यंत काढण्यात आली. संस्थानचे उपाध्यक्ष चंद्रशेखर कदम यांनी वीणा, विश्वस्त भाऊसाहेब वाकचौरे व उपजिल्हाधिकारी मनोज घोडे पाटील यांनी श्रींची प्रतिमा व विश्वस्त ॲड. मोहन जयकर यांनी पोथी घेऊन मिरवणुकीत सहभाग घेतला. यावेळी मुख्य कार्यकारी



साईभक्त श्री. चन्ना रेड्डी यांनी ३२ लाख ३० हजार रुपये किंमतीच्या ११३३ ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या पादुका संस्थानचे अध्यक्ष डॉ. सुरेश हावरे व सौ. नलिनी हावरे यांच्याकडे देणगी स्वरूप सुपूर्त केल्या.



भक्तिमय वातावरणात शिर्डीमध्ये रामनवमी उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी भाविकांची प्रचंड गर्दी झाली होती.

भक्तिमय वातावरणात राम जन्मोत्सव

अधिकारी रूबल अग्रवाल, उपजिल्हाधिकारी धनंजय निकम, कर्मचारी, ग्रामस्थ व साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. मिरवणूक द्वारकामाईत गेल्यानंतर श्री साईसच्चरित या पवित्र ग्रंथाच्या अखंड पारायणाचा शुभारंभ झाला. यामध्ये उपाध्यक्ष चंद्रशेखर कदम यांनी प्रथम, सौ. सरस्वती वाकचौरे यांनी व्दितीय, विश्वस्त ॲड. मोहन जयकर यांनी तृतीय, साईभक्त अभय धाढीवाल यांनी चौथा व श्रीमती छायाताई दत्तात्रय शेळके यांनी पाचव्या अध्यायाचे वाचन केले. सकाळी ६.१५ वाजता मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती रूबल अग्रवाल यांनी सहपरिवार श्रींची विधीवत पाद्यपूजा केली.

उत्सवाच्या प्रथम दिवशी राज्याचे वित्त आणि नियोजन, मंत्री सुधीर मुनगंटीवार व पालकमंत्री प्रा. राम शिंदे यांनी श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. ह.भ.प.श्री. विक्रम नांदेडकर यांचे कीर्तन झाले. मंदिर परिसरात द्वारकामाई मंडळ, मुंबई यांनी उभारलेला श्रीशंकर भगवान व श्री साईबाबांची मूर्ती असलेला देखावा व विद्युत रोषणाई पाहण्यासाठी साईभक्तांनी गर्दी केली होती. तसेच मंदिरात व मंदिर परिसरात दिल्ली येथील देणगीदार साईभक्त श्रीमती स्नेहा शर्मा यांच्या देणगीतून फुलांची सजावट करण्यात आली. विक्रम महाराज नांदेडकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने उत्साही वातावरणात उत्सवाची सांगता झाली.

■■■




साईभक्त जयंतभाई यांनी ३९ लाख १ हजार ६८८ रुपये किंमत असलेली १३५१ ग्रॅम वजनाची सोन्याची पंचारती देणगी मुख्य कार्यकारी अधिकारी रूबल अग्रवाल यांच्याकडे सुपूर्त केली.



श्रीरामनवमी उत्सवाच्या सांगतादिनी समाधी मंदिरात काल्याच्या कीर्तनानंतर दहीहंडी फोडण्यात आली.

(पान १७ वरुन)

या अभंगात संत एकनाथांनी कीर्तनाची रूपरेषाच मांडलेली आहे. सगुण चरित्रांचे वर्णन, तेही अंतरंगी भक्तियुक्त श्रद्धेने करणे तसेच कीर्तनात भक्ती व ज्ञाना व्यतिरिक्त इतर गोष्टी सांगू नयेत. तर मग काय सांगावे तर ज्या कथनाने देवाची मूर्ती आपल्या मनामध्ये ठसेल अशाच गोष्टी कथन कराव्यात. ईश्वराची हृदयात निरंतर प्रतिस्थापना होणे हे कीर्तनाचे उद्दिष्ट आहे. एवढेच नव्हे तर कीर्तन–नामस्मरण हे मोक्षाचे सर्वात प्रभावी साधन आहे.



कृ. जा. भीष्म

श्री साईबाबांना या सर्व कीर्तन परंपरा ज्ञात होत्या. साईभक्त गोपाळ गुंड, श्यामा देशपांडे, तात्या दादा कोते यांनी साईबाबांपुढे शिर्डीत उरूस–धार्मिक यात्रेची कल्पना मांडली. तेव्हा बाबांनी त्यास अनुमती दिली व रामनवमीची यात्रा सुरू झाली. हेमाडपंत श्रीसाईसच्चरित अध्याय ६ मध्ये म्हणतात – 'तेव्हापासून बाबांच्या मते यात्रा ठरविली रामनवमी । व्यवस्था पाहती तात्या कोते । यात्रा येते । अपरंपार ।।' अशी रामनवमीच्या वेळी यात्रा सुरू होताच, रामनवमी निमित्त रामजन्मोत्सवही व्हावा अशी कल्पना साईभक्त कृष्णराव भीष्म यांना सुचली. त्यांनी ती काका महाजनींना वाड्यात बोलून दाखविली आणि दोघे बाबांकडे गेले. तेव्हा सर्वज्ञानी बाबांनीच 'वाड्यात काय चर्चा चालू होती' असा प्रश्न केला. तेव्हा भीष्मांनी रामजन्मोत्सव (पाळणा–कीर्तन) व्हावा अशी इच्छा व्यक्त केली. 'विचार बाबांचे मनास रूचला । निश्चित केला उत्सव।।' आता रामजन्म उत्सव करायचा तर कीर्तनकार पाहिजे. शिर्डीसारख्या छोट्या गावात ऐनवेळी कीर्तनकार कोठून मिळणार–येणार? तेव्हा खुद्द कृष्णराव भीष्म यांनीच रामजन्माचे कीर्तन केले व काकांनी त्यांना साथ केली. अशा प्रकारे शिर्डीमध्ये कीर्तन (रामजन्मोत्सवाचे) करण्याचा पहिला मान साईभक्त कृष्णराव जागेश्वर भीष्म (बुटीबोरी–नागपूर) यांना लाभलेला आहे. कृष्णराव भीष्म हे बहुश्रुत–व्यासंगी साईभक्त होते ते दादासाहेब खापर्डे, बुट्टी यांच्या समवेत शिर्डीला आले होते. त्यांच्या अपार व अगाध साईभक्तीचे दर्शन म्हणजे त्यांनी संकलित केलेली 'साई सगुणोपासना' पुस्तिका होय !

शके १८३३ (इ.स.१९११) साली शिर्डीत रामनवमी जन्मोत्सव सुरू झाला. त्याला आता १०८ वर्षे झाली आहेत. रामजन्मोत्सवाचे पहिले कीर्तन भीष्मांनी केले. भीष्मांच्या कीर्तन सोहळ्याचे हेमाडपंत साईसच्चरित पोथीत वर्णन करतात – ''आधीच भीष्म बहुश्रुत । विविध कथा पारंगत । कीर्तन झाले रसभरित । आनंद अपरिमि श्रोतया ।। बाबाही तै प्रसन्नवदन ।''

१) (१९११) प्रथम रामजन्मोत्सव, कीर्तनकार : कृ. जा. भीष्म

२) (१९१२) द्वितीय रामजन्मोत्सव, कीर्तनकार : बाळाबुवा भजनी (अर्वाचिन तुका)

३) (१९१३) तृतीय रामजन्मोत्सव, कीर्तनकार : बाळाबुवा सातारकर

४) चौथ्या वर्षापासून रामजन्मोत्सवाचे कीर्तन करण्यास श्री साईबाबांनी दासगणूंना सांगितले व पुढे अनेक वर्षे दासगणूंनी न चुकता बाबांच्या आज्ञेचे, गुरू आज्ञा म्हणून निष्ठेने, सेवाभावाने पालन करीत रामजन्माचे कीर्तन केले. हेमाडपंतांच्या श्रीसाईसच्चरित पोथीत या विषयीची एक ओवी पुढीलप्रमाणे – 'असो पुढे एक दिवशी । दासगणू येतां शिर्डीसी । देवविला प्रार्थुनि बाबांसी । उत्सव प्रतिवर्षी ।। (६/११८)'. दासगणूमहाराज १९२३ ते १९५३ पर्यंत साईसंस्थानचे निर्वाचित अध्यक्ष होते. दासगणूंनी सुमारे ३०–३५ वर्षे रामनवमीची कीर्तन सेवा केली. दासगणू थकल्यानंतर शिर्डीतील रामजन्मोत्सवाचे कीर्तन, त्यांचे उत्तराधिकारी शिष्य, थोर विचारवंत प्राचार्य अनंतराव आठवले यांनी अनेक वर्षे केले. प्राचार्य अनंतरावांनंतर गोरटे येथील दासगणू प्रतिष्ठान संस्थेद्वारे दरवर्षी रामजन्मोत्सवासाठी कीर्तनकार पाठविण्याची पद्धत सुरू झाली आणि ती आजपर्यंत अव्याहतपणे सुरू आहे. नुकत्याच (२०१८) झालेल्या रामनवमी उत्सवात युवा कीर्तनकार विक्रम विनायकराव नांदेडकर यांचे कीर्तन झाले. श्री. विक्रम नांदेडकर हे प्राचार्य अनंतराव आठवले यांचे नातू आहेत तर दासगणूमहाराजांचे पणतू आहेत. अशाप्रकारे शिर्डी येथील कीर्तनसेवेची परंपरा असून रामजन्मोत्सवाशिवाय गुरुपौर्णिमा व दसऱ्याच्या वेळी साईबाबा पुण्यतिथी या उत्सवातही तीन दिवस कीर्तन सेवा होते. गोपाळकाल्याच्या कीर्तनाने सर्व उत्सवाची तिसऱ्या दिवशी सांगता होते. गोपाळकाला (दहीहंडी) कीर्तनाची शिर्डीतील परंपरा १९११ पासूनचीच आहे. 'गोपाळकाला तो हा वैकुंठी दुर्लभ।' असे संत तुकाराममहाराजांनी गोपाळकाल्याचे महत्त्व अभंगातून विशद केलेले आहे.

(लेखक साईलीलाचे कार्यकारी संपादक आहेत.
मो . ९८८१९०९७७५
Email: vidyadhartathe@gmail.com)

■■■

समाजसेवेचे व्रत घेतलेले 'श्री साईनाथ' मंडळ



साई सेवेच्या प्रेरणेतून विविध राज्यातल्या अनेक शहरांमध्ये आणि अगदी ग्रामीण भागातही भक्तांनी एकत्र येऊन अनेक उपक्रम सुरु केले. पुण्यातील साईनाथ मंडळ हे अशाच साई परिवारातले एक प्रातिनिधीक मंडळ म्हणता येईल. निरपेक्ष समाजसेवेच्या भावनेतून या मंडळाने सामाजिक कार्याची एक परंपरा उभी केली आहे. मंडळाच्या या कार्याचा हा अल्प परिचय –

मिलन म्हेत्रे

साईबाबा – साक्षात ईश्वर... प्रत्येक मनाचे आणि भक्तीचे गुरू... श्रद्धास्थान... साध्या, सरळ सोप्या शब्दांत भक्तांना त्यांनी ज्ञानामृत पाजले आणि आपलेसे केले. श्रद्धा आणि सबुरी एकाच नाण्याच्या दोन बाजू... हे त्यांनी पटवून दिले... मानवी जीवनात भक्तीचे, ज्ञानाचे आणि दानाचे एक सुंदर जग आहे. हे त्यांनी स्पष्ट केले. 'श्रीसाईसच्चरित'मध्ये चौथ्या अध्यायात बाबांचे वर्णन खूप समर्पकपणे केले आहे.

धनिक म्हणावे जरी तुला तरि भिक्षाटण करिसी।
फकिर म्हणावें तरी कुबेरा दानें लाजविसी ।।

बाबांची दानवृत्ती या दोन ओळींमधून लक्षात येते. 'द' या शब्दाचा अर्थ दातृत्व हे बाबांनी खूप चांगले समजवून दिले आहे. आज समाजात दानापेक्षा मानाला महत्व आहे. संतांच्या शिकवणुकीत आपण कोणत्या गोष्टी उचलतो, हे महत्त्वाचे आहे. ज्ञानदान, अन्नदान, औषधदान या गोष्टी बाबांनी खऱ्या अर्थाने समाजात पोहोचवल्या. बाबांच्या मार्गावरून चालणाऱ्या आणि बाबांनाच आधारस्तंभ मानणाऱ्या अनेक संस्था केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर भारतात अनेक ठिकाणी आहेत. समाजसेवा हे व्रत खऱ्या अर्थाने अंगीकारणाऱ्या संस्था आणि संस्थाचालक बाबांनी दाखवलेली दिशा आणि दिलेली दृष्टी सर्वस्व मानून काम करीत आहेत. पुण्यातील 'साईनाथ मंडळ' ही अशीच एक संस्था. साईबाबा हे भक्ताकडून सर्व करून घेणारे आहेत अशा भावनेने हे मंडळ काम करीत आहे. मंडळाची स्थापना १९५९ मध्ये झाली आणि १९९७ मध्ये हे मंडळ रजिस्टर झाले. खरे तर हे आधी सार्वजनिक गणेश मंडळ होते. याच्या माध्यमातून मंडळाने १९८८ मध्ये 'शिर्डी के साईबाबा' हा विषय घेऊन देखावा सादर केला बाबांच्या मंदिराची आणि सेवेची संकल्पना येथेच साकारली. गणेशोत्सव संपला; पण बाबांची मूर्ती तिथेच राहिली आणि साईनाथ मंडळाच्या कार्यकर्त्यांनी एक सुंदर मंदिर बांधले. १९९४ मध्ये येथे बाबांची पाच फूट उंचीची अत्यंत सुबक संगमरवरी मूर्ती जयपूरहून बनवून आणली. एकाच ठिकाणी श्रीसाईबाबा आणि श्रीगणेश अशा दोन्ही आराध्यांची पूजा, सेवा येथे सुरू झाली. यामध्ये प्रकाश ऊर्फ बाबा शिंदे आणि त्यांच्या कार्यकर्त्यांचे श्रेय मोठे आहे. पुण्याच्या मध्यवर्ती ठिकाणी दगडुशेठ गणपती मंदिरापासून अवघ्या तीन-चार मिनिटांच्या अंतरावर असलेल्या या मंडळ ट्रस्टतर्फे गणेशोत्सव, दसरा, रामनवमी, गुरुपौर्णिमा असे धार्मिक कार्यक्रम तर मोठ्या उत्साहाने साजरे होतातच; पण त्याचबरोबर समाजोपयोगी कार्यक्रमात देखील मंडळाचे मोठे योगदान आहे.

मंडळाचा गणेशोत्सव अत्यंत देखणा असतो. समाजप्रबोधन हेच मंडळाचे ध्येय आहे, त्यामुळे मंडळाने आजपर्यंत 'मुलगी वाचवा', 'गणेशोत्सव कालचा आणि आजचा', 'कचऱ्याची समस्या', 'जलक्रांती', 'मुलांच्या दप्तराचे ओझे', 'तरुणांनो सैन्यात भरती व्हा', 'सायबर गुन्हे', 'अवयवदान नव्हे जीवनदान...' असे अनेक जिवंत देखावे सादर केले. विशेष म्हणजे या देखाव्यांमधील कलाकार हे मंडळाचे कार्यकर्तेच



गेल्या तीन वर्षांपासून साईनाथ मंडळ ट्रस्टतर्फे दरवर्षी मुळशी येथील कातकरी पाडावर जाऊन तेथील आदिवासींना फराळाचे वाटप करण्यात येते.

असतात. जनजागृती करणाऱ्या या मंडळाला आजवर अनेक पुरस्कारांनी गौरवले गेले आहे.

साईनाथ मंडळ ट्रस्ट वर्षभर अनेक उपक्रम यशस्वीपणे राबवत आहे. त्यात उल्लेखनीय उपक्रम म्हणजे अन्नभेसळ ओळखण्याच्या सोप्या पद्धती, लहान मुलांचे लैंगिक शोषण अवयवदान याबाबत पुस्तिका छापून त्यांचे मोफत वाटप करून समाजजागृती केली जाते. पुरंदर या दुष्काळी तालुक्याच्या काही गावातील बंधाऱ्यातील गाळ काढून जलसंवर्धनाचे महत्त्व मंडळाने ग्रामस्थांना पटवून दिले आहे. प्लॅस्टिक प्रदूषण ही एक मोठी समस्या सध्या सगळ्यांनाच भेडसावत आहे. यासाठी मंडळ कागदी पिशव्यांचे मोफत वाटप करीत आहे. आजवर ५० हजार पिशव्यांचे वाटप मंडळाने केले आहे.

पुण्यात अनाथ मुलांच्या अनेक संस्था आहेत. मंडळाचे कार्यकर्ते अशा संस्थांमध्ये जाऊन या मुलांना खाऊ वाटपाबरोबरच त्यांच्या आरोग्यासाठी, शिक्षणासाठी काम करीत आहे. 'पुस्तकांबरोबरच माणसंही वाचा' हा मंडळाचा एक स्तुत्य उपक्रम आहे. या उपक्रमांतर्गत मंडळ यशस्वी आणि राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त दिव्यांगांसाठी उपक्रम राबवते. त्यातून तरुण पिढीला प्रेरणा मिळते. अलीकडेच मंडळाने मुला-मुलींच्या निरीक्षण गृहात एक कार्यक्रम आयोजित केला होता. त्यात ज्या गुन्हेगार महिला व पुरुष कैद्यांनी तरुंगात असतांना उत्तम शिक्षण घेतले आणि प्रतिकूल परिस्थितीवर मात करून आज उत्तम आयुष्य जगत आहेत, अशा काहींसाठी मदतीचा हात पुढे केला आहे.

याबरोबरच मंडळ देवदासी किंवा समाजाने नाकारलेल्या त्यांच्या मुलांना आपले सण कळावे या उद्देशाने नागपंचमी, राखी पौर्णिमा, गुढपाडवा, संक्रांत, नरकचतुर्दशी, भाऊबीज यासारखे उपक्रम राबवते. देवदासींच्या मुलांचं औक्षण करून हे सण साजरे केले जातात. दिवाळीमध्ये अनाथलय, रुग्णालय किंवा वृद्धाश्रमामध्ये पणत्या रंगवण्याच्या कार्यशाळा घेतल्या जातात. गेली सलग चार वर्षे मंडळ एचआयव्हीबाधित आणि देवदासींच्या मुलांचे संगोपन करणाऱ्या संस्थांचा मातृदिनी विशेष सत्कार करीत आहे.

भारतीय जवान ही देशाची अस्मिता आहे. मंडळ दरवर्षी वीरमातांचा सत्कार करून आपल्या सैनिकांबद्दल आदर व्यक्त करते. सैनिकांसोबत रक्षाबंधन साजरे करते. 'तरुणांनो, सैन्यात



मंडळाने सफाई कामगारांबरोबर साजऱ्या केलेल्या राखी पौर्णिमा उत्सवात अभिनेत्री विभावरी देशपांडे ही सहभागी झाली होती.

भरती व्हा' हा संदेश देत यावर्षी मंडळाने चारशे विद्यार्थ्यांची मानवी राखी तयार करून ती सैनिकांना अर्पण केली आहे. ,

सफाई कामगारांचे काम अतिशय कष्टाचे असते. गणेशोत्सव अथवा इतर सणांच्या काळात त्यांच्या कामावर येणारा ताण, याचबरोबर त्यांच्या कामात असणारे सातत्य या गोष्टी लक्षात घेऊन मंडळ पुण्यातील सफाई कामगारांचा फक्त सत्कार करून थांबत नाही, तर त्यांच्यासाठी आरोग्य शिबिरही आयोजित करते. पहिल्या डॉक्टर महिला डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ गेल्या चार वर्षांपासून बाजीराव रस्त्यावर असलेल्या त्यांच्या भारत गायन समाज या निवासस्थानी पुण्यातील डॉक्टर महिलांसाठी एक कृतज्ञता सोहळा आयोजित करण्यात येतो. यामध्ये सन्मानचिन्ह, शाल-श्रीफळ देऊन डॉक्टर महिलांचा सत्कार केला जातो.

मंडळातर्फे २००६ पासून 'श्रीसाई पुरस्कार' दिला जातो. कलामहर्षी प्रा. डी. एस. खटावकर, डॉ. रामचंद्र देखणे, सामाजिक कार्यकर्त्या रेणुताई गावसकर, निवृत्त एअर चीफमार्शल भूषण गोखले, शास्त्रीय गायक राहुल देडपांडे, संजीव अभ्यंकर, मेकअप-मन विक्रम गायकवाड, पंडित विजय घाटे, नृत्यांगना शर्वरी जमेनीस, लेफ्ट. जन. विनायक पाटणकर आदींना आतापर्यंत हा पुरस्कार दिला गेला आहे.

साईनाथ मंडळ ट्रस्टचा कार्याचा आलेख असा चढता आहे. समाजाचा पैसा सामाजासाठीच वापरायचा हे मंडळाचे ब्रीद आहे, पियुष शहा, शंकर निंबाळकर, अमित दासानी, नरेंद्र व्यास, अमर हिरेशिखर, बाळासाहेब निंबाळकर, संकेत निंबाळकर, नंदू नायर, प्रवीण वळवडेकर आदी कार्यकर्ते या मंडळाच्या माध्यमातून समाजात विविध विषयावर जनजागृती करण्यासाठी झटत आहेत. मंडळ सर्वस्वी स्वतःच्या पायावर या सगळ्या गोष्टी करत आहे, हे येथे मुद्दाम नमूद करावेसे वाटते.

मंडळाच्या या सगळ्या कार्याला बाबांचा आशीर्वाद आहेच आहे; बाबांच्या कृपाछत्राखाली हि सगळी मंडळी काम करत आहेत आणि बाबांनी देखील त्यांना कृपाशीर्वादाने योग्य दिशा दाखवली आहे.

■■■



ट्रस्टतर्फे वीरमातांचा सत्कार केला जातो.

आवाहन

साईबाबांच्या प्रेरणेने विविध ठिकाणी सेवाकार्य अव्याहतपणे चालू आहे. अशा कार्याचा साईभक्तांना आणि सर्व सामान्य जनतेला 'साई अर्पण सेवा' मधून परिचय करून देणार आहोत. साई परिवारातील भक्तांनी अशा कामांची माहिती छायाचित्रासह जरुर पाठवावी. संबंधित माहिती bhagwandatar@gmal.com या मेल वर किंवा 'साईनिकेतन' ८०४ बी. डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई-४०० ०१४ या पत्त्यावर पाठवावी.

- संपादक



श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळ्यानिमित्त श्री साईबाबा संस्थान, विश्वस्तसंस्था, शिर्डी यांच्याकडे असलेल्या आणि स्वतः बाबांनी वापरलेल्या चर्मपादुकांचे रविवारी (दि. १५ एप्रिल २०१८) पुण्यात आगमन झाले. हा दर्शन सोहळा राजेंद्र जाधव आणि रश्मी पिल्ले यांनी आयोजित केला होता. या सोहळ्याला पुण्यातील श्री साईबाबा पालखी सोहळा समिती, आणि श्री साईदास मंडळ यांचे विशेष योगदान लाभले. बाबांच्या 'चर्मपादुका' पुण्यात प्रथमच आल्या असल्याने शेकडो भाविकांनी या पादुकांचे दर्शन घेतले.

तिरूपतीला केशदान शिर्डीत रक्तदान

'पत्रं-पुष्पं-फलं-तोयं' अशा गोष्टी अर्पण करून आपण परमेश्वराची पूजा करत असतो. याच समर्पण भावनेने भाविकांनी रक्तदान केले तर त्यांच्या पूजेची उंची कितीतरी वाढेल. नेमका हाच विचार करून संस्थानने भक्तांना रक्तदानाचे आवाहन केले आणि साईभक्तीने भारलेल्या भक्तांनी त्याला उंदड प्रतिसाद दिला. साई समाधी मंदिरात व परिसरात रक्तदानाची एक अभिनव मोहीम सुरू झाली. सुरुवातीच्या अल्प प्रयत्नांतून रोज शंभर जणांचे रक्तदान व्हायला लागले. हा आकडा लवकरच ५०० पर्यंत जाईल असा संबंधित अधिकाऱ्यांचा दावा आहे. या मोहिमेसाठी संस्थानने विविध रक्तपेढ्यांची मदतही घेतली आहे. विशेष म्हणजे अशा रक्तदान करणाऱ्या भक्ताला दर्शन रांगेत प्राध्यान्य दिले जाते. साईचं दर्शन सुलभतेनं होणं या पेक्षा अधिक मोठा असा दुसरा कुठला आनंद भक्तांना असणार आहे? शिर्डीत रोज ५० ते ७० हजार भाविक दर्शनाला येतात. यापैकी अवघ्या १ टक्का भाविकांनी जरी रक्तदान केले तरी खूप मोठ्या प्रमाणावर रक्त संकलन होऊ शकेल आणि त्याचा रुग्णांना फायदा होईल.



या मोहिमेअंतर्गत दिनांक ३० डिसेंबर २०१७ रोजी शिर्डीत महारक्तदान शिबिर आयोजित करण्यात आलं होतं. त्या शिबिरात ९०० पेक्षा जास्त भाविकांनी रक्तदान करून प्रतिसाद दिला.

या महारक्तदान शिबिराचे उदघाटन संस्थानचे अध्यक्ष डॉ. सुरेश हावरे यांच्या हस्ते व संस्थानचे उपाध्यक्ष चंद्रशेखर कदम, विश्वस्त भाऊसाहेब वाकचौरे, प्रताप भोसले, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती रूबल अग्रवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

यावेळी 'चला हवा येऊ द्या' या मालिकेतील अभिनेता भारत गणेशपुरे, संस्थानच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती रूबल अग्रवाल, उपजिल्हाधिकारी धनंजय निकम, शिर्डी ग्रामस्थ, संस्थान कर्मचारी आदिंनी रक्तदान केले. कोपरगांव येथील रक्तदाते राजेंद्र सारंगधर यांनी या शिबिरात रक्तदान करून रक्तदानाचे शतक पूर्ण केले.

■■■

संतांचा कर्मयोग सिद्धांत



संतांनी मानवता धर्म समाजात खोलवर रुजवायचा प्रयत्न केला. 'जे जे भेटिजे भूत ते ते मानिजे भगवंत' हीच या संतांची जीवन दृष्टी होती. आज जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत असुरक्षितता आणि अस्वस्थता आहे. या पार्श्वभूमीवर संतांनी सांगितलेल्या समाजसेवेवर आधारित मानवता धर्माचं जागरण मोठ्या प्रमाणावर करणं गरजेचं आहे. हीच सद्गुरू साईनाथांची खरी पूजा ठरेल.

दीपा भंडारे

भारत भूमी ही विश्वातील सर्वश्रेष्ठ आध्यात्मिक भूमी आहे. आज हजार वर्ष झाली तरी भारतातील आध्यात्मिक तत्वज्ञान आणि संतांचे विश्वशांतीचे विचार जगाला मार्गदर्शन करत आहेत. 'वेदांत' म्हणूम ओळखली जाणारी विविध उपनिषदे आणि त्यांचा सारभूत 'अमृतोपदेश' असणारी भगवद्गीता या प्रमुख संस्कृत वांङ्मयाने हजारो वर्षे ज्ञानतेजात रत असणाऱ्या भारतात आध्यात्मज्ञानाची जोपासना केली. सर्व संतांचं – सत्पुरुषांचं कार्य या गीतेच्या तत्वज्ञानावरच आधारित आहे. भारतात आतापर्यंत जे जे संत, महापुरुष झाले त्यांनी धर्म आणि भक्तीचा प्रचार करतांना त्याचा गाभा असणारी माणुसकी आणि भूतदया स्वतः प्रत्यक्षात आचरून दाखवली आणि ती समाजात रुजवायचा अखंड प्रयत्न केला. सद्गुरु साईबाबांचं जीवन चरित्र या निष्काम कर्मयोगाचं आदर्श आणि प्रत्यक्ष प्रमाण आहे.

भगवद्गीता हा जीवन ग्रंथ केवळ वाचण्यासाठी किंवा पाठांतरासाठी नाही, तर जीवन समरांगणात प्रत्यक्ष आचरणात आणण्यासाठी आहे. जीवन संघर्षात लढण्याचं बळ देणारा आणि ऐहिक – पारलौकीक कल्याणाचं यथोचित मार्गदर्शन करणारा ग्रंथ म्हणजे गीता होय. 'योगः कर्मसु कौशलम' हा गीता तत्वज्ञानाचा पाया असून तो आचरणात आणण्यासाठीच भगवान श्रीकृष्णांनी अवतार घेतला. प्रवृत्ती आणि निवृत्ती, भक्ती आणि ज्ञान, स्वउद्धार आणि परउद्धार यांचा सुंदर संगम असणारं भक्तीयुक्त निष्काम कर्मयोगाचं सारभूत तत्वज्ञान श्रीकृष्णांनी गीतेत सांगितलं आणि स्वतः आचरून दाखवलं.

भारतीय अध्यात्म शास्त्रानुसार धर्म अर्थ काम आणि मोक्ष या चार पुरुषार्थावर भारतीय संस्कृती आणि जीवनशैली आधारलेली असून मोक्ष अर्थात ईश्वरप्राप्ती हे मनुष्यजन्माचं सर्वश्रेष्ठ ध्येय मानलं आहे.

मोक्षाचं हे ध्येय गाठण्यासाठी मानवी जीवनाला धर्माचा म्हणजेच सदाचार आणि नीतीमत्तेचा पाया असणं अत्यंत गरजेचं आहे. त्यासाठी कर्मशुध्दी आणि निष्काम कर्मयोगाचं आचरण गीतेनं सांगितलं आहे. केवळ आंधळी भक्ती करत राहून ईश्वरप्राप्ती होत नाही, तर ईश्वरकृपेला पात्र होण्यासाठी भक्तीयुक्त कर्मयोग हा चित्तशुध्दीचा श्रेष्ठ मार्ग गीतेनं सागितला आहे. 'आत्मनो मोक्षार्थ जगतहितायच' या शास्त्र वचनानुसार परमात्म प्राप्तीसाठी भक्तीकारण आणि राष्ट्रोन्नतीसाठी समाजकारण अर्थात समाजसेवा ही गीतेत आवश्यक मानली आहे. ज्या समाजात राहून भक्तीसाधना करायची त्या समाजाच्या स्वास्थ्यासाठी,







धारणेसाठी, भरणपोषणासाठी आणि संरक्षणासाठी सेवाकार्याला आणि त्याद्वारे निष्काम कर्मयोगाच्या आचरणाला सर्व संतांनी सर्वांत जास्त महत्त्व दिलं आहे. साईबाबांसह सर्व संतांनी वेळोवेळी समाजाला याच कर्मयोगाचा उपदेश केला आहे. आध्यात्माच्या नावाखाली निष्क्रियता, आळस, ढोंगीपणा, दैववाद याला सर्व संतांनी कडाडून विरोध केला आहे.

यासंदर्भात साक्षात प्रभू रामचंद्रांच्या जीवनातील एक प्रसंग कर्मयोगाचं महत्त्व स्पष्ट करणारा आहे. कुलगुरू वसिष्ठांच्या आश्रमातील उपनिषदांच्या अभ्यासानंतर प्रभू रामचंद्रांना वयाच्या १६ व्या वर्षीच कमालीचं वैराग्य आलं. आश्रमातून आयोद्धेत परतल्यावर त्यांचं कशातच मन रमेना. वस्त्र, अलंकार, आभूषणं, विविध पदार्थ. युद्ध अभ्यास या कशातच त्यांना रस वाटेना. ते सतत अंतर्मुख रहायला लागले. त्यांची ही अवस्था कुणाला बघवेना. ते युवराज होते, अयोध्येचे भावी राजे होते, लोकनेते होते. तेच असे निष्क्रिय झाले तर बाकीचा समाज पुरुषार्थहीन होईल हे जाणून वसिष्ठांनी प्रभू रामचंद्रांना योगवसिष्ठ या ग्रंथाद्वारे याच निष्काम कर्मयोगाचा उपदेश केला.

'अंत:स्त्यागी बहीर्भोगी लोके विहर राघव' या वचनानुसार अंत:करणात संसाराची आसक्ती न ठेवता भक्ती कर आणि बाह्य लौकिक जीवनात अखंड निष्काम कर्मयोगाचं, समाज उद्धाराचं काम कर असा तो उपदेश होता. १९ व्या शतकात रामकृष्ण परमहंसानीही स्वामी विवेकानंदांना हाच समाजोत्थानाचा उपदेश केला. स्वामीजी अखंड ध्यान धारणेत, निर्विकल्प समाधीत रमू लागले. मात्र रामकृष्ण परमहंसाना त्यांच्याकडून जगभर धर्मप्रसाराचं सेवाकार्य करून घ्यायचं होतं. तेंव्हा स्वामीजींना बोलावून घेऊन रामकृष्णांनी 'शिवभावे जीवसेवा दरिद्री नारायणाची पूजा' हाच कर्मयोगाचा उपदेश केला. आणि तुझ्या निर्विकल्प समाधीची किल्ली आता माझ्याकडे आहे असा प्रेमाचा दमही दिला.


महाराष्ट्रातसुद्धा गेली ७०० वर्षे १८ पगड जातीतील संतांची जी मांदियाळी निर्माण झाली त्या सर्व संतांनी स्वधर्माचरण करून भक्तीबरोबरच दु:खी व पीडितांच्या सेवाकार्याचा आदर्श समाजासमोर घालून दिला. ७०० वर्षापूर्वी भागवत धर्माचा पाया रचणाऱ्या संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांनी तर विश्वात्मक सर्वेश्वराकडे अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी पसायदान मागितलं. या भागवत धर्माचा कळस होण्याचं भाग्य लाभलेले संतश्रेष्ठ तुकाराम महाराजही याच मानवता धर्माचा उपदेश करतांना सांगतात – 'जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले, तोची साधु ओळखावा देव तेथेची जाणावा.'

संत नामदेव, संत एकमनाथ समर्थ रामदास स्वामी या सर्व संतांनी हाच मानवता धर्म समाजात खोलवर रुजवायचा प्रयत्न केला. 'जे जे भेटिजे भूत ते ते मानिजे भगवंत' हीच या संतांची जीवनदृष्टी होती. आज २१ व्या शतकात विज्ञान तंत्रज्ञानाची एवढी प्रचंड प्रगती आणि भौतिक समृद्धीची वाढ मोठ्या प्रमाणात होऊनही भारतीय समाजात गरीब– श्रीमंत यांच्यातील दरी वाढतेच आहे. त्यामुळे समाजातील अगदी थोड्या समूहाचं जीवन सुसह्य तर मोठ्या प्रमाणातील जनसमुदायाचं जीवन असह्य होत चाललं आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात असुरक्षितता आणि अस्वस्थता आहे.

ही अस्वस्थता प्रत्येकाला आपल्यापुरता स्वार्थाचा विचार करायला लावून आत्मकेंद्री वृत्ती वाढवायला मदत करत आहे. या पार्श्वभूमीवर संतांनी सांगितलेल्या समाजसेवेवर आधारित मानवता धर्माचं जागरण मोठ्या प्रमाणावर करणं गरजेचं आहे. या जनसेवेच्या व्रताचं आचरण हीच सद्गुरू साईनाथांची खरी पूजा ठरेल यात शंका नाही.

■■■

सेवा कधीही जाई न व्यर्थ



सेवा म्हणजे इतरांना सुखी समाधानी करण्यासाठी केलेले काम. निरपेक्ष भावनेने असे काम केल्यास त्यातून मिळणारे समाधान आणि आनंद यांची तुलना अन्य कशाशीही होऊ शकत नाही. सर्वांभूती परमेश्वर पाहून त्यांची सेवा करण्यानेच ईश्वर प्राप्ती होते. साईनाथांनी आपल्या आचरणाने भक्तांना अशा निरपेक्ष सेवेसाठी उद्युक्त केले आहे.

मयूरी कदम

साई पुरवील तयाचे अर्थ। पुरवील स्वार्थ आणि परमार्थ। सेवा कधींही जाई न व्यर्थ। अंतीं तो कृतार्थ करील।।...

जीवमात्राची सेवा, हीच खरी सेवा, ही शिकवण साधुसंतांनी दिली आहे... एकदा यक्षाने युधिष्ठिराला प्रश्न विचारला की, 'या जगात सर्वांत श्रेष्ठ धर्म कोणता?' यावर युधिष्ठिराने उत्तर दिले की, 'सेवाधर्म हा सर्वांत श्रेष्ठ धर्म होय!'...

सेवाभावानुसार वर्तन हा मानवाचा अत्यंत मौल्यवान आणि कायमस्वरूपी स्मरण देणारा असा अलंकार आहे. याची किंमत कोणालाही करता येणार नाही. हयातीत व हयातीनंतरही तो स्मरण देणारा आहे. म्हणूनच, मनुष्याने सतत सेवारत असावे, याची शिकवण आपल्याला बालपणापासूनच प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे मिळत जाते... ही शिकवण आपल्याला निसर्ग देत असतो. वृक्ष-वल्ली ही फुले, पाने, फळांनी बहरतात; आणि हे सर्व ती स्वत:कडे न ठेवता सर्वांना देत असतात... शीतल छाया देऊन मनाला शांती देतात. सुगंधित फुले देऊन मन प्रसन्न करतात. फळे देऊन भूक शमवितात... सूर्य स्वत:ला तळपवून अवघ्या जगाला ऊर्जा देतो, चेतना देतो. चंद्र शीतल छाया देतो... या सर्वांमुळे समस्त जीवमात्राचे जीवन सुखावह होते. निसर्ग हे सर्व जीवमात्राच्या कल्याणासाठी सेवाभावी वृत्तीने अविरत करीत आहे. निसर्गामुळेच तर जीव जन्माला येतो, तो पोसला जातो. यासाठी त्याला कुठल्याही फळाची मोबदल्याची अपेक्षा नसते. निसर्गाचे हे आपल्यासाठीचे सेवाकार्य आपण लक्षात घेत नाही. कारण, आपण आपल्याच स्वार्थी परिघात वावरत असतो...

खरं पाहिलं, तर सेवाभावामुळेच मानवी जीवनाला खरा अर्थ प्राप्त होतो. श्रीमद् भगवद्गीतेत भगवंतांनी सांगितलेच आहे की, 'सकल प्राणिमात्राच्या हितासाठी जे झटतात ते अंती मलाच येऊन मिळतात.'...

मनुष्य जन्माला येऊन जर मनात, आचरणात सेवाभाव नसेल, तर मनुष्यजन्म व्यर्थच गेला, असेच म्हणावे लागेल. म्हणजेच, मनुष्याच्या आणि इतर पशुपक्ष्यादी जीवजंतुंच्या जन्मात काहीच फरक नाही. असा जन्म म्हणजे –

श्वानेंही आपुलीं पोटें भरितीं। प्रजोत्पादन यथेष्ट करितीं। तेथें नरदेहाचीच काय महती। साम्यस्थिती उभयतां जैं।। (श्री साईसच्चरित, अ. ८, ओ. ११)

यामुळे अनमोल असा लाभलेला नरजन्म वाया घालविणे म्हणजे निव्वळ मूर्खपणा होय!

महद्भाग्याचिया परवडी। वेंचूनियां पुण्यकोडी। लाधली नरदेहाची जोडी। घडीनें घडी साधावी।। (श्री साईसच्चरित, अ. ८, ओ. ४१)

या ओवीनुसार नरदेहाचे सार्थक करून घेणे आपल्या हाती आहे... आणि ते केवळ सेवाभावामुळेच शक्य होऊ शकते. यासाठीच तर आपल्या साधु-संतांनी, गुरु-सद्गुरूंनी वेळोवेळी आपल्या उक्ती-कृतीतून सेवाभावाचे महत्त्व दाखवून दिले आहे.

सेवाभाव, म्हणजे तरी काय हो? तर, दीनदुबळ्यांना, रुग्णांना, दिव्यंगांना, गोरगरीबांना, अज्ञानी जनांना, पशुपक्ष्यांना सहाय्य करणे, त्यांच्या गरजा पुरविणे. हे कार्य निष्काम भावनेने करून त्यांच्या जीवनात आनंद, सुख निर्माण करण्याचा प्रयत्न करणे, म्हणजे सेवाभाव!... या सेवाभावाचे अनेक प्रकार आहेत. अक्षरसेवा, कीर्तनसेवा, आजारी व्यक्तीची शुश्रूषा करणे, तहानलेल्यांना पाणी देणे, भुकेलेल्यांना अन्न देणे, विद्येपासून वंचित असलेल्यांना विद्या देणे आदींचा यात अंतर्भाव होतो. याचबरोबर कुणाचीही निंदा न करणे, कटू बोलून कुणालाही न दुखावणे, भांडण-तंटे न करणे या बाबीही स्वभावातील



सेवाभावच दर्शवितात. कारण, कुणाची निंदा केल्याने वा त्याच्याशी भांडल्याने किंवा त्याच्याविषयी कटू बोलल्याने संबंधित व्यक्ती दुखावली जाते... सेवा म्हणजे आपल्याशी संबंध येणाऱ्यांना संतुष्ट ठेवणे. कुणाला दुखावून आपण त्याला संतुष्ट ठेवू शकत नाही. म्हणूनच, अशा वाईट गोष्टी टाळणे हीदेखील सेवाच होय! याचे धडे आपल्याला श्री साईसच्चरित्रात ठिकठिकाणी मिळतात.

यावर, एवढी सेवा करून आपले काय साध्य होणार? आपल्याला याचा काय फायदा? असा विचार, असे प्रश्न मनात येणे साहजिकच आहे. कारण, आपण कलियुगातील मानव, जो फक्त स्वतःचा, कुटुंबाचा, आप्तजनांचा विचार करतो. यामुळे असे विचार मनात आले नाहीत, तरच नवल.

येथे एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, या सेवांमुळे प्राणिमात्रांचे भले तर होतेच, शिवाय आपल्यालाही आत्मसमाधान मिळते. हे अमोलिक समाधान पैशाने वा कुठल्याही किमती वस्तूने विकत मिळत नाही. हा आनंद आनंदाचे डोही आनंद तरंग देणारा असतो. याचबरोबर अशी सेवा केल्याने आपण आपल्या इष्टदेवतांच्या अधिक जवळ जातो. या सेवाधर्मामुळे आपल्यातील अहंकार लोप पावत जातो. सर्वांप्रती आस्था, ममता निर्माण होते. तनामनामध्ये अद्वैताची भावना निर्माण होते... आणि आपण सगुण भक्तीतून निर्गुण भक्तीकडे वाटचाल करू लागतो. सर्वांभूती परमेश्वर हा भाव मनात तयार होतो; आणि आपण सर्वांभूती ईश्वर पाहू लागतो. म्हणूनच, सेवाधर्माला मनुष्यजन्मात अनन्यसाधारण महत्त्व आहे.

ईशतत्वाला प्रिय सेवाभावाने पुजिले तर, त्याचा आधार मिळून मनुष्यप्राणी भवसागर सहजपणे पार करू शकतो आणि त्याच्या मनुष्य जन्माचे सार्थक होते. यामुळेच संतांनी आपल्याला सेवाभावाचा मार्ग दाखविलेला आहे...

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. संतांची थोर परंपरा या भूमीला लाभलेली आहे. या संतांनी वेळोवेळी आपल्या उक्ती आणि कृतीतून सेवाभावाचे महत्त्व समाजाला पटवून दिले आहे. येथे आपण त्यांच्या सेवाभावाचा थोडक्यात आढावा घेऊ. यातून सेवेचे प्रकार, त्यामागचा उद्देश व कार्य आपल्याला अधिक स्पष्टपणे समजण्यास मदत होईल.

संत ज्ञानेश्वर महाराज, म्हणजे सर्वांची माऊली, जिने आपले अवघे जीवनच सकल प्राणिमात्रांच्या सेवेसाठी वेचले. ज्या माऊलीवर त्या काळी समाजाकडून अन्यायच झाला त्या माऊलीने समाजाला आपल्या प्रेमाने, सेवाधर्माने आपलेसे केले. कधीही चीड येऊन त्याला प्रत्युत्तर दिले नाही. एवढेच नव्हे, तर अखिल विश्वात प्रिय झालेले जे पसायदान ईश्वराकडे मागितले. त्यातही जे दुष्ट आहेत, जे खल आहेत त्यांच्यासाठी त्यांनी दान मागितले...

जे खळांची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मी रती वाढो। भूतां परस्परे पडो। मैत्र जीवांचे।। दुरितांचें तिमिर जावो। विश्व स्वधर्म सूर्ये पाहो। जो जें वांछील तो तें लाहो। प्राणिजात।।

माऊली या ओव्यांतून विश्वात्मक देवाकडे मागणे मागते की, जे वाईट, दुष्ट लोक आहेत त्यांच्यातील दुष्टपणा संपून जाऊन, त्यांच्यात परस्परांबद्दल मैत्रीचे संबंध निर्माण होऊ दे! वाईट लोकांच्या जीवनातील तिमिर, म्हणजे अंधार निघून जाऊन त्यांच्या जीवनात स्वधर्मरूपी सूर्याचा उदय होऊ दे! सकल प्राणिमात्राच्या चांगल्या इच्छांची पूर्तता होऊ दे! कमाल आहे ना या ज्ञानमाऊलीची! ज्यांनी छळले, त्रास दिला त्यांच्यासाठीच वाग्यज्ञाची समाप्ती झाल्यावर दान मागतात. बरे,

हा वाग्यज्ञ, म्हणजेच ज्ञानेश्वरी लिहिली कुणासाठी? तर, सामान्य जनांसाठी आणि का, तर त्या काळी सामान्य जनांना तथाकथित पंडितांनी ज्ञानापासून वंचित ठेवले होते म्हणून. त्यावेळचे ज्ञान हे कठीण अशा संस्कृत भाषेत होते. यामुळे सामान्यजन ज्ञानापासून दूर होते; त्यांना कुठलाही आधार नव्हता. अशा वेळी ज्ञानेश्वर माऊलीने अक्षरसेवा, तसेच ज्ञानसेवेचे व्रत हाती घेऊन श्रीमद् भगवद्गीता मराठीत सहज-सोप्या रूपात आणून जनांना ज्ञानी केले. माऊलीची ही अक्षरसेवा, ज्ञानसेवा आजही सकल जनांच्या उपयोगी पडत आहे.

संत नामदेवांनी आपल्या अभंग व कीर्तनांद्वारे समाजाला भक्तीचा सोपा मार्ग दाखवून, अधर्माच्या वाटेवरून चालणाऱ्या समाजाला धर्माची वाट दाखवून दिली. सर्वसामान्य जनांचा उद्धार व्हावा यासाठी नामदेव थेट पंजाबसह सर्वत्र फिरले. एवढा जनसेवेचा खडतर वसा त्यांनी उचलला.

संत एकनाथांनी आपल्या अभंग, भारुड, गौळण यांतून अंधश्रद्धांनी घेरलेल्या समाजाला जागृत केले. तसेच, जातिभेद मानणाऱ्या समाजाला आपल्या कृतीतून जनसेवा, प्राणिमात्रांच्या सेवेचे धडे दिले. यांच्या काळात समाजात जातिभेद विकोपाला पोहोचला होता. लोक दलित व्यक्तींची सावलीदेखील अंगावर पडली, तरी आंघोळ करीत. अशा विचारसरणीच्या समाजात एकनाथ महाराजांनी जातिभेद नष्ट करण्याचे अपूर्व कार्य केले. त्यांनी आपले विचार केवळ भारुडांतून व कीर्तनांतून व्यक्त केले नाहीत, तर आपल्या कृतीतून, आचरणातून हे सेवाकार्य केले.

संत एकनाथ त्रिकालसंध्या करीत असत. असेच एकदा ते मध्यान्ह संध्या आटोपून गोदावरीच्या घाटावरून परतत होते. उन्हाचा तडाखा भयंकर होता. उन्हाच्या झळांनी अंग पोळल्यासारखे होत होते. एकनाथ झरझर पावले टाकत निघाले होते. तेवढ्यात त्यांना लहान मुलाच्या रडण्याचा आवाज आला. त्यांनी अवतीभोवती पाहिले, तर एक लहान मूल घाटावर त्या रणरणत्या उन्हात रडत बसले होते. हे दृश्य पाहून कोमल मनाच्या एकनाथांचा जीव कळवळला. त्यांनी धावत जाऊन त्या बाळाला उचलले. त्याच्या डोक्यावर आपला पंचा धरला. मातीने माखलेल्या त्या बाळाला आंघोळ घातली. ते बाळ एका अस्पृश्याचे, दलिताचे होते. एकनाथांना हे कळल्यावर त्यांनी त्या बाळाला दलितवस्तीत नेऊन त्याच्या पालकांच्या स्वाधीन केले. असेच एकदा एकनाथांनी पाण्याविना तडफडणाऱ्या गाढवाला पाणी पाजून त्याचे प्राण वाचविले. अशा तऱ्हेने सकल प्राणिमात्रांची सेवा, हाच खरा धर्म असल्याचे त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले.

संतांच्या या कृतीतून एक गोष्ट प्रकर्षाने सिद्ध होते, ती म्हणजे केवळ देवळात जाणे, पोथी-पुराण वाचणे, जपमाळ



ओढणे, याने ईश्वराची प्राप्ती होत नाही, तर सर्वांभूती ईश्वर पाहणे आणि त्याची सेवा करणे यानेच ईश्वराची प्राप्ती होते.

सेवेचे हे अनन्यसाधारण महत्त्व जाणूनच श्री साईनाथांनीही वेळोवेळी भक्तांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या सेवेसाठी उद्युक्त केले. एवढेच नव्हे, तर आपल्या कृतीतून तसे दाखवूनही दिले...

बाबांनी केवळ माणसांचीच सेवा केली नाही, तर प्राणिमात्रांचीही सेवा केली असल्याचे आपल्याला श्री साईसच्चरितात वाचावयास मिळते. बाबांचे शिर्डीत आगमन झाले, तेव्हापासून ते बाबांनी समाधी घेईपर्यंत बाबा प्राणिमात्रांची सेवा करीत होते. आताही कुठल्या-ना-कुठल्या रूपात ते भक्तांच्या हाकेला धावून त्यांची सेवा करीत असतात.

बाबा शिर्डीत आले, तेव्हा गावातील मंडळींच्या दृष्टीने ते एक साधे फकीर होते. ते थोर ईश्वरी अवतार आहेत, याची पुसटशीही जाणीव त्यावेळी कुणाला झाली नाही. अगदी





बाबांनीही तसे दाखवून दिले नाही. सुरुवातीला ते गावात वैद्य, हकीम म्हणून प्रसिद्ध होते. ते आजारी व्यक्तीला तपासून औषधे देत, त्यांची सेवा करीत.

आरंभीं गांवीं वैद्यकी करीत। पाहूनि पाहूनि दवा देत। हातालाही यश बहुत। हकीम विख्यात जाहले।।... दिडकीस नाहीं कोणाच्या शिवले। गुणानें प्रख्यातीतें पावले। गरीब दुबळ्यांस आरोग्य दिधलें। हकीम गाजले ते प्रांतीं।। (श्री साईसच्चरित, अ. ७, ओ. ४६, ७०)

गरिबांना विनाखर्च उपचार व्हावा यासाठी बाबांनी वैद्यकी केली. याव्यतिरिक्त यामागे त्यांचा अन्य कोणताही हेतू नव्हता.

हकीम हा तों केवळ परार्था। अति उदास तो निजस्वार्था। साधावया परकीयार्था। असह्यानर्था साहतसे।। (श्री साईसच्चरित, अ. ७, ओ. ७१)

इतरांना सुख मिळावे, आराम मिळावा, त्यांना त्रास होऊ नये यासाठी अनेक वेळा त्यांनी स्वतःवरही कठीण प्रसंग ओढवून घेतले; पण जनसेवेचे व्रत अबाधित ठेवले.

एकदा दादासाहेब खापर्डे यांची पत्नी आपल्या लहान मुलाला घेऊन शिर्डीला आली. त्यावेळी मुलाला खूप ताप आला. तेव्हा गावात ग्रंथीज्वराची साथ आली होती. त्यामुळे मुलाची आई खूप घाबरली. शिर्डीतून निघून आपल्या घरी परतावे, असे तिच्या मनाने ठरविले. त्यासाठी बाबांची परवानगी घेण्यासाठी ती गेली. बाबा संध्याकाळची फेरी करीत वाड्याशेजारी आले असता मुलाच्या आईने सर्व वृत्तांत बाबांना सांगून अमरावतीला आपल्या घरी परत जाण्यासाठी त्यांची आज्ञा मागितली, तेव्हा बाबा म्हणाले,

...''आभाळ आलें आहे जाण। पडेल पाऊस पीक पिकोन। आभाळ वितळून जाईल।। भितां किमर्थ'' ऐसें वदून। कफनी कंबरेपर्यंत उचलून। दाविते झाले सकळांलागून। ग्रंथी टवटवून उठलेल्या।। कुक्कुटीच्या अंड्यांएवढे। चार ग्रंथी चोहींकडे। म्हणती ''पहा हें भोगणें पडे। तुमचें सांकडें मजलागीं।।'' (श्री साईसच्चरित, अ. ७, ओ. १०६-१०८)

बाबांनी स्वतःवर त्या मुलाच्या ग्रंथी घेऊन खापर्डे कुटुंबाचे दुःख हरण केले. तसेच, एकदा धनत्रयोदशीच्या दिवशी लोहाराची तान्ही मुलगी चुकून तिच्या आईच्या हातून निसटून भट्टीत पडले असताना बाबांनी धगधगत्या धुनीत हात घालून त्या मुलीला वाचवले.


शिर्डीत पटकीची साथ आली असता बाबांनी जात्यावर स्वतः गहू दळायला घेतले... आणि त्या पिठाने महामारीला घालवून दिले. बाबांनी भिमाजी पाटलाचा क्षयरोग घालवला. धुनीच्या उदीने कित्येकांचे असाध्य रोग घालवले. कित्येकांना जीवदान दिले.

कैक रुग्णांची सेवा बाबांनी स्वतः तर केलीच, त्याचबरोबर भक्तांकरवीही करून घेतली. बाबा स्वतः दररोज पाच घरे फिरून मागून आणलेली भिक्षा मशिदीतील कुंडीत ठेवत. त्यातील काही अन्न मशीद झाडणारी बाई घेऊन जात असे; कुत्रे, कावळेही ते अन्न खात असत; पण बाबांनी त्यांना कधीही अडवले नाही.

एणेंपरी जें अन्न आणीत। मशिदींतील कुंडींत ठेवीत। कावळे कुत्रे त्यांतचि खात। कधीं न हांकीत तयांना।। मशीद-आंगण झाडणारी। त्यांतूनि दहाबारा भाकरी। घेऊनि जाई आपुले घरीं। कोणी न वारी तिजलागीं।। (श्री साईसच्चरित, अ. ८, ओ. १००-१०१)

बाबा गोरगरिबांना अन्नदान करीत. त्यासाठी ते स्वतः जेवण बनवीत आणि गोरगरीब, दीन-दुबळ्यांना स्वहस्ते जेऊ घालीत. बाबा भक्तांना शिकवण देत की...

आल्यागेल्याचा आदर करीं। तृषितां जल भुकेल्या भाकरी।



उघड्यास वस्त्र बसाया ओसरी। देतां श्रीहरी तुष्टेल।। (श्री साईसच्चरित, अ. १९, ओ. १४२)

बाबा केवळ मनुष्यमात्राचीच सेवा करीत असे नाही, तर त्यांची सेवा सकल प्राणिमात्रांसाठी असे. श्वान, सुकरांची भूक ते शमवीत. बकऱ्या, शेळ्या आदी संबंधात येणाऱ्या प्राण्यांची ते सेवा करीत. एवढेच नव्हे, तर व्याधीग्रस्त वाघालाही बाबांनी व्याधीतून मुक्त करून मोक्षप्रद प्राप्त करून दिले.

बाबा त्यांना दक्षिणेपोटी आलेले पैसेही गोरगरिबांना दान करीत.

ऐसे प्रतिदिनीं दोन तिजला। सहा देत त्या जमलीला। पांच दादा केळकरांला। भाग्या सुंदरीला दोन दोन।। दहा ते पंधरा तात्याबासी। पंधरा ते पन्नास फकीरबाबांसी। आठ वांटिती गोरगरिबांसी। नित्यनेमेंसी हें देणें।। (श्री साईसच्चरित, अ. २९, ओ. २९–३०)

बाबांनी स्वत: भक्तांना योग्य मार्ग दाखविण्यासाठी श्रीमद् भगवद्गीतेचे श्लोक सांगून, त्याचे विवरण करून ज्ञानाचा खरा मार्ग दाखविला.

बाबा स्वतः सेवा करीत असल्याचे पाहून भक्तांना तशी प्रेरणा मिळे. भक्त त्यांचे अनुसरण करू लागत. ते आपापल्यापरीने बाबांची व अन्य सेवा करीत असत. बाबाही ती गोड मानून घेत. अशा सेवेकरी भक्ताला कोणी नाव ठेवलेलं बाबांना खपत नसे. एकदा एक मावशीबाई बाबांचे पाठ व पोट चेपत होती...

जोर लावून बाबांचे पाठ व पोट चेपण्याची तिची ती पद्धत बघून तेथे बाबांच्या दर्शनार्थ आलेल्या एका भक्ताने त्या मावशीबाईंना बाबांचे पाठ व पोट हळू चेपण्यास सांगितले. तुमच्या अशा चेपण्याने बाबांच्या शिरा तुटतील ना, म्हणून सुनावले. त्याच्या या बोलण्याची बाबांना चीड आली. रागाच्या भरात त्यांनी आपला सटका उचलून त्याचे एक टोक आपल्या पोटाला व दुसरे टोक खांबाला लावून दोन्ही हातांनी खांब जोरात कवटाळला. जवळ–जवळ सव्वा हात लांब असलेला तो सटका बाबांच्या पोटात घुसला असेच ते भयंकर दृश्य पाहून वाटले. सेवा करणाऱ्यांना कोणी अनुचित बोललेले वा टोकलेले बाबांना अजिबात खपत नसे.

कधीं कोणीही सेवा करितां। मध्येंच दर्शवितां अनुचितता। किंवा सेवेकऱ्यास कोणी बोलतां। बाबांचे चित्ता खपेना।। (श्री साईसच्चरित, अ. २४, ओ. १३५)

अशा तऱ्हेने बाबांनी सेवा करणाऱ्यांना प्रोत्साहन दिले आहे, अनेक भक्तांकडून दीनदुबळ्यांची, गोरगरिबांची, अज्ञानी जनांची सेवा करवून घेतली आहे. याची ठळक प्रातिनिधिक उदाहरणे म्हणजे – काकासाहेब दीक्षित, नानासाहेब चांदोरकर, दादासाहेब खापर्डे यांच्याकडून गोरगरिबांची, गरजवंतांची सेवा, दासगणू महाराज, अण्णासाहेब दाभोलकर यांच्याकडून अक्षरसेवा, प्रबोधन सेवा, राधाकृष्णाआई, बाळा पाटील नेवासकर यांच्याकडून स्वच्छतासेवा, म्हाळसापती, काशिनाथ शिंपी, तात्या कोते यांच्याकडून गावात येणाऱ्या साधुसंतांची आदरातिथ्याची अतिथी सेवा, माधवराव देशपांडे यांच्याकडून माध्यमसेवा, काकासाहेब दीक्षित, हरि विनायक साठे, बापूसाहेब बुट्टी यांच्याकडून भक्तांकरिता निवाससेवा बाबांनी करवून घेतली...

बाबांचे सांगणे असे की, तुम्ही तुमचे कर्म समर्पित भावनेने, निष्काम बुद्धीने करा; अशी सेवा कधीही व्यर्थ जात नाही.

याचे अनन्यसाधारण उदाहरण संतपरंपरेत भक्त पुंडलिकाचे पाहावयास मिळते... एकदा साक्षात् परब्रह्म पुंडलिकाच्या भेटी त्याच्या दारी गेले... तेथे पुंडलिकाची मातृ–पितृसेवा पाहून प्रभावित झालेले परब्रह्म पुंडलिकाच्या शब्दाखातर त्याने फेकलेल्या विटेवर कायमचे उभे राहिले... सेवेचा हा असा महिमा अपरंपार आहे.

बाबांनी तर सांगूनच ठेवले आहे तुम्ही जोर काढूं लागा। दुधाची काळजी सर्वस्वी त्यागा। वाटी घेऊनि उभाच मी मागां। पृष्ठभागां आहें कीं।। म्हणाल जोर म्यां काढावे। दुधाचे प्याले तुम्हीं रिचवावे। हें तों आपणा नाहीं ठावें। दक्ष असावें कार्यार्थीं।। (श्री साईसच्चरित, अ. १९, ओ. १५८–१५९)

प्रारंभी बायजाबाई रानावनातून शोध घेऊन बाबांना भाजी–भाकरी खाऊ घालत असे. या सेवेमागे तिची कोणतीही अपेक्षा नव्हती. तरीही बायजाबाईचे निधन होताना बाबांनी तिला दिलेला शब्द तिचा पूत्र, तात्या कोते यांचे मरण स्वत:वर ओढवून शब्दश: पाळला... आणि सेवा कधींही न जाई व्यर्थ याची प्रचिती दिली.

■■■

तेथे कर माझे जुळती



अनेक सेवाव्रती, ईश्वराचे दूत होऊन मानवाची सेवा करत आहेत. तिथे परमार्थ आहे; पण स्वार्थ नावालाही नाही. तिथे परमात्म्याचं दर्शन आहे; पण प्रदर्शन अजिबात नाही. तिथे आहे तो फक्त आणि फक्त निखळ आनंद, निर्मळ मन, अढळ निष्ठा, सात्त्विकता. अशा या सेवाव्रतींसाठी 'तेथे कर माझे जुळती।' याशिवाय आणखी वेगळी भावना ती कोणती असणार!

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. या पवित्र मातीत अनेक संतांनी लौकिकार्थाने जन्म घेतला. खरं तर, प्रत्येक युगायुगात अधिकाधिक अध:पतीत होत जाणाऱ्या समाजाचं उत्थापन करण्यासाठीच संतांचा अवतार असतो; नव्हे, ही त्या त्या काळाचीच गरज असते.

असे अवतार अव्यक्तातून आकाराला येतात आणि कार्यसमाप्तीनंतर पुन्हा त्या अव्यक्तात विलीन होतात. ते देहरूपाने येथे असोत, वा नसोत, त्यांचं अनंतत्व मात्र सदैव प्रतीत होत राहतं; किंबहुना त्यांच्या अवतारसमाप्तीनंतर तर ते अधिक प्रकर्षाने जाणवू लागतं.

संतांचा अवतार घेण्याच्या पार्श्वभूमीचा विचार करताना असं लक्षात येतं की, याचं कारण आपल्या मानवी प्रवृत्तीतच दडलेलं आहे. प्रत्येक मनुष्यप्राणी हे चांगल्या-वाईटाचं, दैवी आणि आसुरी संपत्तीचं कमी-अधिक मिश्रण आहे. आसुरी संपत्ती अथवा दुष्ट प्रवृत्तीच आपल्याला अधिक आकर्षून घेतात. इतकंच नव्हे, तर कधी कधी आपल्याला अधर्माने वागायला लावतात आणि अनेकदा खोल गर्तेत रुतवून, आयुष्यातूनही उठवतात. एकूणच, वर वर मोहून टाकणाऱ्या या दुष्प्रवृत्ती अंतिमत: मानवाच्या नाशाला कारणीभूत होतात. कोळी जसं सुंदर जाळं विणतो आणि अखेर त्यातच अडकून मृत्यू पावतो तशी आपली गत असते.

मुग्धा दिवाडकर

समाजाचं उन्नयन हेच संतांचं कार्य!

बेगडी आणि अशाश्वत सुखाला चटावलेल्या आपल्यासारख्या दुबळ्या जीवांना त्यापासून परावृत्त करून योग्य मार्गावर आणणं अशा वेळी फारच महत्त्वाचं असतं... आणि हेच कार्य संत, सद्गुरू करतात. भक्तीच्या झेंड्याखाली सर्व समाजाला एकत्र आणून चुकलेली प्रवाहाची दिशा सत्कार्याच्या मार्गाने वळवून समाजाचं उन्नयन करायचं, हे त्यांचं अद्वितीय असं कार्य असतं.

परमार्थाचं विवेचन करताना नवविधा भक्ती म्हणजे काय, परमार्थाचा सोपान चढून जाणं प्रत्येक जीवासाठी अपरिहार्य का आहे, त्यासाठी सद्गुरु कसा वाटाड्या, मार्गदर्शक आणि सहाय्यक होतो, सत्संगतीचं महत्त्व काय, प्रपंचाचं अशाश्वत स्वरूप आणि परब्रम्हाचं शाश्वत रूप याची जाणीव सतत ठेवणं का आवश्यक आहे, आत्मोन्नती म्हणजे नेमकं काय आणि ती प्राप्त कशी करून घ्यायची इत्यादी अनेक प्रश्नांची उकल त्यांच्या सहवासाने, त्यांच्या सत्संगाने अथवा त्यांच्या ग्रंथसाहित्यातून आपल्याला अगदी सहजपणे होते.

भक्तीसाठी प्रथम श्रद्धा अनन्यतम असावी लागते आणि निष्ठा अत्यंत बळकट! भक्तीचा गाभा नीती आणि नीतीचा गाभा सदाचार! त्यामुळेच पारमार्थिक उन्नयनाबरोबरच, त्यातूनच सामाजिक जाणीवेचं भान संतांनी आपल्याला वेळोवेळी आवर्जून करून दिलं आहे.

जाती, पंथ, धर्म याचा खरा अर्थ समजून न घेता समाजाला चिथावणं, इंद्रियभोगांत रमणं, संस्कृतीचं अध:पतन करण्यात धन्यता मानणं, अंधश्रद्धा, बुवाबाजी, अनाचार इत्यादी करू नये त्या गोष्टी करणं, भोगवादी जीवनाला अवास्तव महत्त्व देणं आणि मुख्य म्हणजे, 'सर्वांभूती परमेश्वर' या भागवत धर्माच्या परमपवित्र संकल्पनेलाच तिलांजली देणं, म्हणजे तुकाराम महाराज म्हणतात त्याप्रमाणे 'तुका म्हणे गाढव पशु। केला नाशु आयुष्याचा।।'... दुसरं काय?

तर, काही लोक याच्या वाटेला जात नाहीत; पण होमहवन, पूजापठण, उपासतापास, कर्मकांड, यज्ञयाग, अनुष्ठान

म्हणजेच अध्यात्म असं समजून त्याच्याच पाठी लागतात. हे केलं म्हणजे आपण धार्मिक आहोत, सेवाव्रती आहोत, अशी मनाची समजूत करून घेतात. हीच परमेश्वराची सेवा, असं मानतात. हे चुकीचं नसलं तरी यामध्येच गुंतून पडणं हानिकारक ठरतं. यातून मिळालेला आनंद शाश्वत असणार नाही, हेही निश्चित! किंबहुना, यामध्ये दिखाऊपणाच अधिक असतो.

अखंड सेवाव्रती होणं हाच खरा परमार्थ

खरं तर भगवंताला यातलं काहीच अपेक्षित नाही. जातीसंस्थेची चौकट, भक्तिहीन जीणं, ही कर्मकांडं, दिखाऊ आणि बेगडी प्रेम हे त्याला मुळात मान्यच नाही. त्याला पाहिजे आहे ते वैराग्यपूर्ण आणि त्याच्या शिकवणुकीप्रमाणे केलेलं आचरण, निर्मळ भक्ती, अनुभवांचा सच्चेपणा, अंत:करणातील समत्व, फलाची अपेक्षा न करता केलेली सेवा... मग ती भगवंताची असो अथवा एखाद्या दुबळ्या गरजू जीवाची! सांगायचं काय, तर चैतन्याची अनुभूती घेत जीवनातलं पावित्र्य जपणं आणि अखंड सेवाव्रती होऊन त्यातून मिळणारा आनंद लुटणं म्हणजेच खरा परमार्थ!

आपला देह नश्वर आहे. तरीही त्याचे फाजील लाड पुरवण्यातच आपण आपलं स्वार्थी आयुष्य खर्ची घालतो. पण, बंधुभगिनींनो, हा स्वार्थ भगवद्चिंतनाने आपल्याला स्वार्थत्यागात बदलता येतो. म्हणूनच आपले बाबा नेहमी म्हणत, 'आपला आतला आवाज ओळखायला शिका!'

असं आहे, देह हे मंदिर मानलं, तर आतला आत्मा हा ईश्वर आहे आणि तो तुमच्या-माझ्या, एकूणच प्रत्येक सजीव आणि निर्जीवातसुद्धा भरून राहिला आहे. मग तो आपल्या अंतरंगातच असताना आपल्याला शाश्वत सुख, समाधान का प्राप्त होत नाही? तर, ते मिळवण्याचा आपला मार्गच मुळात चुकलेला असतो... कारण, हा आनंद मिळविण्यासाठीची आपली धडपड केवळ स्वत:च्या चौकटीपुरती असते. मी आणि माझं कुटुंब एवढ्यापुरतीच ती मर्यादित असते. इतरांशी त्याचं काही देणं-घेणं नसतं... आणि कर्तव्यात जो चुकतो आणि भगवंताला विसरतो त्याला शाश्वत सुख, समाधान कसं प्राप्त होणार! पण, जे या मार्गाने न जाता ईश्वरप्रणित मार्गाने जातात ते मात्र हा शाश्वत आनंद मिळवून धन्य होतात.

म्हणूनच, आपल्याला नीतीबोध देताना साईबाबांसारख्या संतांनी स्वत: सेवाव्रती होऊन जगाला सन्मार्ग दाखवला. संत ज्ञानेश्वरांनी तर स्वत:साठी नाही, अमुक एका समाजासाठी नाही, तर अवघ्या विश्वासाठी 'पसायदान' मागितलं. त्यांनी आधी केलं आणि मगच जगाला सांगितलं.

भगवंताने दाखवलेल्या मार्गाने जाणं, त्याच्या वचनांचं पालन करणं, त्याप्रमाणे आचरण करणं, दीनदुबळ्यांची सेवा करणं





आणि प्रत्येक जीवात भगवंत पाहणं, हीच खरी भक्ती आणि हीच खरी भगवद्सेवा! भक्तीची परिणती अखेर विश्वकल्याणातच होणार ना!

परमार्थाचा राजमार्ग अर्थात् विश्वकल्याण!

आत्मकल्याण, समाजकल्याण आणि पर्यायाने विश्वकल्याण, हाच संतांना अभिप्रेत असलेला परमार्थाचा राजमार्ग आहे. याचं मार्गदर्शन करतच संतांनी समाजप्रबोधन केलं. भरकटलेल्या जीवाला ताळ्यावर आणण्यासाठी याचाच उपयोग केला आणि आपल्या भक्तांना आत्मज्ञानाचा लाभ मिळवून दिला.

प्रत्येक जीवातल्या सद्गुणांची वृद्धी व्हावी म्हणून संतांची नेहमीच धडपड असते. साईबाबांनीही नेहमी याच मार्गाचा अवलंब केला. ईश्वरसेवेबरोबरच त्यातून निर्माण होणारी समाजसेवेची मनोधारणा एकदा का पक्की झाली की हा ब्रम्हानंदाचा लाभ असे सात्त्विक जीव स्वत:पूरताच मर्यादित ठेवत नाहीत; साऱ्या जगाला वाटण्यासाठी ते तत्पर होतात. देह अंतर्बाह्य निर्मळ झालेला असतो. अहंकार समूळ विलयाला





गेलेला असतो. त्यातूनच 'अवघाचि संसार सुखाचा करीन। आनंदे भरीन तिन्ही लोक।।'ही विश्वात्मक भावना निर्माण होते. अशा निर्मळ व्यक्तींच्या समाजसेवेमुळे मग परमार्थालाही बळकटी येते.

हे लिहिताना थोर तत्वचिंतक आणि अध्यात्माचे गाढे अभ्यासक कै. श्रीपादशास्त्री किंजवडेकर यांची तीव्रतेने आठवण होते. ते म्हणतात, 'आपल्या आयुष्यातील उगवणारा प्रत्येक दिवस आणि दिवसातील प्रत्येक क्षण याचा हिशेब आपणास देता आला पाहिजे. दुसऱ्याजवळ नसला, तरी आपला आपणास देता यावयास हवा. कारण, आपले आयुष्य जसे आपले आहे तसेच ते त्याहून अधिक आपल्या साऱ्या समाजाचे आहे. यासाठीच आपले आयुष्य ही आपली वैयक्तिक मिरासदारी केव्हाही मानू नये. साऱ्या समाजाचा त्यावर तुमच्याइतकाच हक्क आहे. आपण आपल्या बळावर जगू शकत नाही. अनेकांचे प्रेम, सहकार्य, सहाय्य जगण्यासाठी आवश्यक असते.'

याचाच अर्थ, समाजस्वास्थ्य जर टिकवायचं असेल तर सामाजिक जाणीवेचं भान व्यापक असणं अत्यंत आवश्यक आहे. त्याचबरोबर ईश्वरावरील श्रद्धा आणि समाजसेवा यांची सांगड घालणंही अपरिहार्य आहे.

साईबाबांच्या सहवासात आलेल्या जवळपास सर्वच व्यक्तींनी हे भान कायम जपलं. किंबहुना, संतांची शिकवण शिरोधार्य मानून त्याप्रमाणे आचरण करणं आणि 'त्या सेवेत स्वत:ला झोकून देणं, हीच खरी परमेश्वराची सेवा!' हे त्यांनी पूर्णपणे ओळखलं. 'काया, वाचा, चित्त व वित्त' याद्वारे, ही सेवा, हे भान असणाऱ्या प्रत्येकाला करता येते. आणि म्हणूनच, यासंदर्भात बोलताना साईसहवासातील काही सेवाव्रतींचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. संतकवी दासगणू महाराज, राधाकृष्णाआई, काकासाहेब दीक्षित, मिरीकर घराणे, नानासाहेब चांदोरकर, दादासाहेब खापर्डे, कृ. जा. भिष्म, श्रीमंत गोपाळराव बुट्टी, रा. ब. प्रधान, बाळासाहेब देव, रा. ब. धुमाळ, अण्णासाहेब दाभोलकर, साईशरणानंद, आनंदराव पाखाडे, माधवराव अडकर, बाबासाहेब तर्खड, मुक्ताराम, बाळाराम मानकर इत्यादी अनेकांनी श्री साईबाबांसारख्या संतांच्या शिकवणुकीचा, बोधाचा प्रचार आणि प्रसार करून जनसामान्यांना परसेवेचं महत्त्व पटवून दिलं. इतकंच नव्हे, तर स्वत: त्या मार्गाने जाऊन आपल्याबरोबरच इतरांनाही आत्मकल्याणाच्या दिशेने पाऊल टाकण्यासाठी उद्युक्त केलं.

तर, भागोजी, बायजाबाई, लक्ष्मीबाई, तात्या कोते पाटील, म्हाळसापती, माधवराव देशपांडे यासारख्या अनेक अधिकारी व्यक्तींनीही शिर्डीत साईसहवासात राहून लोकांना साईसेवेचं, एकूणच भगवंताचं 'जगोद्धाराचं कार्य' समजावून देऊन त्याचं दान लोकांच्या पदरात भरभरून टाकलं.

आजही असे अनेक सेवाव्रती, ईश्वराचे दूत होऊन त्याच्या सेवेत आणि पर्यायाने समाजसेवेत रहात आहेत. तिथे परमार्थ आहे; पण स्वार्थ नावालाही नाही. तिथे परमात्म्याचं दर्शन आहे; पण प्रदर्शन अजिबात नाही. तिथे आत्मसन्मान आहे; पण अहंकाराचा लवलेशही नाही. तिथे आहे तो फक्त आणि फक्त निखळ आनंद, निर्मळ मन, अढळ निष्ठा, सात्त्विकता, शुद्ध भाव, समर्पणाची भावना आणि प्रचंड आत्मविश्वास!

अशा या सेवाव्रतींसाठी 'तेथे कर माझे जुळती।' याशिवाय आणखी वेगळी भावना ती कोणती असणार!

■■■